# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २७/११/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. २७/११/२०१८ रोजी सभा सुचना क्र. १३ दि. १९/११/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. रवि व्यास हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ५. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ७. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ८. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| ९. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १०. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ११. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |
| १२. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १३. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १४. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांचे आजच्या सभेसाठी स्वागत. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. २७/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** प्रकरण क्र. ११८, **दि. ०७/०९/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**राकेश शाह :-**

०७/०९/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११८ :-**

**दि. ०७/०९/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ९६ :-**

दि. ०७/०९/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११९, **महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना सार्वत्रिक निवडणूक २०१७ चा भत्ता अदा करणेसाठी पुर्नविनीयोजन करणेबाबत.**

**वर्षा भानुशाली :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यामध्ये रु. ८० लाखाचे पुर्नविनियोजन करणेचे दाखविलेले आहे व सोबत जोडलेल्या तक्तामध्ये रु.५ कोटी ४९ लाखाचे पुर्नविनियोजन करणेचे दाखविलेले आहे. तसेच अधिनियमांच्या तरतुदीनुसार अंदाजपत्रकातील एकाच लेखा शिर्षातून त्याच लेखा शिर्षात पोट तरतुदीमध्ये वर्ग करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. मात्र एका लेखाशिर्षातून दुस-या लेखाशिर्षात रक्कम वर्ग करावयाची असेल तर त्यास महासभेची मंजुरी घेण्याची तरतुद आहे. सबब सदरचा प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेब ह्याच्यावर प्रशासनानी खुलासा करावा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी ह्यांना निवडणूक भत्ता आपण शासनाच्या नियमाप्रमाणे देत असतो. आपल्याकडची तरतूद अपुरी होती. त्यामुळे आपण ते देऊ शकले नाही. त्यामुळे आपण पुर्नःविनियोजन करत आहोत. वेगवेगळ्या हेड मधून पैसे अव्हेलेबल झालेले आहेत. त्याचा तपशील आपल्याकडे ठेवलेला आहे. त्या अनुषंगाने आपण पुर्नविनियोजन करावे.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही तरतुद ५ कोटी ४९ लाखाचा आणि खर्च पण तेवढाच दाखवतो. खर्च किती झाला आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

सार्वत्रिक निवडणूक भत्त्यासाठी लागणारी रक्कम ८० लाखाची आहे. ८० लाखासाठी पुर्नःविनियोजन करुन पाहिजे होते.

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्यात त्याचा उल्लेख कुठे केला आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आहे ना. १० नंबरचा आयटम आहे. त्याच्यामध्ये सार्व. निवडणूक भत्ता त्याच्यात ८० लाख दिलेले आहे. आडवा चार्ट आहे. त्याच्यामध्ये दिलेले आहे. आपल्याकडे सार्वत्रिक निवडणूकीसाठी लागणारा खर्च आहे. तो ८० लाख अतिरिक्त लागणार होता. परंतु आपले बाकीचे अस्थायी हेड आहेत. सार्वत्रिक आरोग्य विभागाचे स्मशान भुमीसाठी अस्थायी कर्मचारी त्याच्यासाठी ५० लाख, वाचनालय विभागाची बजेटमध्ये तरतुद केली आहे. त्याच्यापेक्षा जास्त लागत होते. आरोग्य विभाग, घनकचरा विभागाला डंम्पींगसाठी, फवारणीसाठी खर्च, उद्यानमध्ये कर्मचारी आहेत. त्याच्यासाठी लागणार होते. अतिक्रमण विभाग सुरक्षा पोलिस.

**मा. सभापती :-**

साहेब ह्याच्यामध्ये विषय काय आहे. प्रकरण क्र. ११९ टाईप करणे. त्याच्यामध्ये काय सगळे कन्फ्यूजन ते क्लिअर कसे होणार. गोल गोल विषय कशाला देता. कर्मचारी अधिकारी आमच्याकडे येतात

विनंती करतात की आमचा भत्त्याचा विषय आहे. तो मंजूर करुन टाका. ठिक आहे. आम्हाला करायचेच आहे. पण हे काही तरी क्लिअर पाहिजे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

निवडणूकीचे ८० लाखाचे आहे. पुन्हा पुर्नविनियोजनसाठी पुन्हा यावे लागेल. म्हणून एकत्रित केले आहे.

**मा. सभापती :-**

विषय वेगळा पाहिजे. टेक्नीकली कसे आहे आपण रि-ॲप्रोप्रिएशन करतो. त्यांना आपण एका हेडमधून दुस-या हेडमध्ये ट्रान्सफर करु शकतो. पण विभाग आपण विदाऊट जनरल बॉडीच्या मान्यतेने ट्रान्सफर करु शकतो का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आस्थापनेचे अस्थायी हेडसाठी जे दिले आहे. त्यातले हे वेगवेगळे हेड आहेत.

**मा. सभापती :-**

हा जो विषय आहे. सार्वत्रिक निवडणूक त्यासाठी कुठून रि-ॲप्रोप्रिएशन करणार? कुठल्या विभागातून घेणार ते सांगा.

**जुबेर इनामदार :-**

सार्वत्रिक निवडणूकीसाठी तरतूद करण्यात आली होती ना.

**शरद बेलवटे :-**

सन्मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकिय आरोग्य विभाग ह्यामध्ये ३५ कोटी आणि १५ कोटी तरतुद होती. ह्या दोन हेडमध्ये आतापर्यंत झालेला खर्च ९ कोटी आणि ३ कोटी आहे. आस्थापनाचे शिल्लक २५ कोटी आणि १२ कोटी राहतात. हे हेड त्यांनी तिकडे वापरले आहेत. त्यामधुनच ८० लाख त्यांनी वर्ग करुन घेतले आहेत.

**मा. सभापती :-**

आरोग्यामध्ये ते पैसे आपल्याला लागणार नाहीत.

**शरद बेलवटे :-**

एवढे त्यांना लागणार नाहीत. कारण त्यांनी ५ कोटी ४९ लाख इकडे घेतले. २५ आणि १२-३७ कोटीमधुन ५.५० कोटी इकडे घेतले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

साहेब विषय सार्वत्रिक निवडणुकीचा देता आणि भत्त्याचा विषय एकत्र केला, तसेच करायचे होते तर एकत्रित आणायला पाहिजे होते. बेलवटे साहेब सार्वत्रिक निवडणुकीची तरतुद किती होती.

**शरद बेलवटे :-**

५ कोटीची होती.

**जुबेर इनामदार :-**

खर्च किती पडला.

**शरद बेलवटे :-**

संपुर्ण पडला, १ लाख फक्त शिल्लक आहेत.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे ५ कोटी ८० लाख खर्च पडला.

**शरद बेलवटे :-**

कर्मचा-याचा भत्ता द्यायचा बाकी आहे. त्याच्यासाठी पैसे शिल्लक नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

५ कोटी ८० लाख खर्च झाला.

**शरद बेलवटे :-**

केले नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याला खर्च पडला. आपण अदा केले नाही तो विषय वेगळा. खर्च एवढा झाला आहे, तसे ह्याच्यात द्यायला पाहिजे होते.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

१ आणि २ लेखाशिर्षामधून.....

**जुबेर इनामदार :-**

गोषवारा सदोष आहे. गोषवा-यामध्ये स्पष्ट होत नाही की आपल्याला काय पाहीजे. पुर्नविनियोजनाचा विषय अशा प्रकारे दिला जात नाही. इतकी तरतुद होती, इतका खर्च झाला, ह्याची गरज आहे. आणि ह्या हेडमधुन हे पैसे वर्ग करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

साहेब, पुढच्या मिटींगमध्ये तुम्ही नीट द्या. क्लिअर विषय आणि गोषवारा द्या. म्हणजे कोणत्या हेडमधुन पैसे पुर्नविनियोजन करणार आहोत ते तुम्ही सांगा आम्ही करुन देतो. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११९ :-**

**महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांना सार्वत्रिक निवडणूक २०१७ चा भत्ता अदा करणेसाठी पुर्नविनीयोजन करणेबाबत.**

**ठराव क्र. ९७ :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यामध्ये रु. ८० लाखाचे पुर्नविनियोजन करणेचे दाखविलेले आहे व सोबत जोडलेल्या तक्तामध्ये रु.५ कोटी ४९ लाखाचे पुर्नविनियोजन करणेचे दाखविलेले आहे. तसेच अधिनियमांच्या तरतुदीनुसार अंदाजपत्रकातील एकाच लेखा शिर्षातून त्याच लेखा शिर्षात पोट तरतुदीमध्ये वर्ग करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. मात्र एका लेखाशिर्षातून दुस-या लेखाशिर्षात रक्कम वर्ग करावयाची असेल तर त्यास महासभेची मंजुरी घेण्याची तरतुद आहे. सबब सदरचा प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे.

**सुचक :- सौ. वर्षा भानुशाली अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव :-**

प्रकरण क्र. १२०, **दुबार असलेली मालमत्ता निर्लेखित करणेबाबत.**

**राकेश शाह :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते. तथापी काहीवेळेस नजरचुकीने एकाच मालमत्तेस दोन वेळा कर आकारणी करण्यात येते. व मालमत्ताधारक केवळ एकच मालमत्ता कराचा भरणा करीत असल्याने दुबार असलेल्या मालमत्तेच्या नोंदीमुळे मालमत्ता कराच्या मागणीत वाढ होवून थकबाकी रकमेवर व्याजाची आकारणी होवून मालमत्ता कराच्या मागणीमध्ये नाहक फुगवटा होत असल्याने दुबार नोंद झालेल्या मालमत्तेची नोंद निर्लेखित होणे अपेक्षित आहे.

त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांची दुबार कर आकारणी/दुबार नोंद घेण्यात आली असल्याचे प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवाल व आकारणी व मागणी नोंदवही नुसार दिसुन येत आहे. त्याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

नियमित भरणा करत असलेल्या मालमत्तेचे विवरण

| अ. क्र. | मालमत्ता क्र. | सदनिका क्र. | मालमत्ताधारकाचे नाव | जागा क्षेत्र | करयोग्य मुल्य | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एफ ०६०००९४४३००३ | ६४७ | मे. ॲव्हेन्यु सुपरमार्टस प्रा.लि. | ३१४४४ | १०१८७८६ | २१५९६ |

दुबार झालेल्या व निर्लेखित करावयाच्या मालमत्तेचे विवरण

| अ. क्र. | मालमत्ता क्र. | सदनिका क्र. | मालमत्ताधारकाचे नाव | जागा क्षेत्र | करयोग्य मुल्य | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एफ ०६०००९४४३००२ | ६४७ | मे. ॲव्हेन्यु सुपरमार्टस प्रा.लि. | ३१४४४ | १०१८७८६ | ५८९८५२५ |

सबब प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवाल व आकारणी व मागणी नोंदवहीचे अवलोकन केले असता एकाच मालमत्तेस दुबार नोंद झालेली आहे. व सदर दुबार झालेली नोंद रक्कम वसुल करुन घेण्याजोगी नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १५२ नुसार झालेली रक्कम रु. ५८,९८,५२५/- व रक्कम निर्लेखित होईपर्यंतच्या कालावधीतील व्याज रक्कम निर्लेखित करणे ही सभा मंजूरी देत आहे, तसेच आजतोपावेत ज्या रक्कमा निर्लेखित करावयाच्या आहेत त्याचा सविस्तर अहवालासह प्रस्ताव आवश्यक त्या पुर्ततेसह पुढील सभेत ठेवण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय, हे एकच प्रकरण आपल्याकडे आहे का? ह्याच्या पलिकडे दुबारचे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. सभापती महोदय, मागच्या मिटींगमध्ये जशा सुचना दिल्या होत्या. दूबार निर्लिखीत करायच्या ज्या प्रॉपर्ट्या असतील त्यासाठी सर्व विभागांना सुचना दिल्या आहेत. ह्या विभागाचे पहिल्यांदा आले त्यामुळे तो विषय स्थायीला ठेवला आहे. प्रत्येक सभेला आपण वेगवेगळे निर्लेखितचे विषय घेणार आहोत. माझ्याकडे काही विषय येतात. पुढच्या मिटींगला सुद्धा काही ठेवणार आहोत.

**जुबेर इनामदार :-**

प्रभाग समितीला तशी सुचना दिली आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

हो दिली आहे. प्रत्येक प्रभाग समितीचे वेगवेगळे विषय येतील.

**जुबेर इनामदार :-**

५८ लाख रुपये कमी झाले. माझ्या माहितीनुसार बरेच अर्ज तुमच्याकडे प्रलंबित आहेत. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये हा विषय दोन महिन्यांनी परत आला आहे. दोन महिन्याअगोदर आम्ही जेव्हा स्थायीसमिती सभेमध्ये सुचना केली होती. तेव्हा तुम्ही त्यांना काही आदेश काढले असतील तर आजपर्यंत त्यांनी कोणतीच प्रकरण पाठवली नाहीत का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

प्रकरण आली आहेत ती पुढच्या सभेला देतो.

**मा. सभापती :-**

म्हसाळ साहेब तुमच्याकडे जेवढे दुबार संदर्भात अर्ज आले आहेत. त्याची एक यादी बनवा आणि सरसकट सगळे करुन घ्या.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यांचे व्हेरिफिकेशन पंचनामा आपण करत असतो अशी प्रोसिजर असते, त्यामुळे आल्यावर लगेच देत नाही. त्याची प्रत्येक स्तरा वर खात्री करतो आणि खात्री झाल्यावर आपण प्रस्ताव देतो.

**मा. सभापती :-**

जेवढे अर्ज येतील त्याचा डेटा सेप्रेट मेंटेन करा म्हणजे आम्हाला पण अंदाज येईल की, असे किती अर्ज पेंडीग आहेत.

**प्रकरण क्र. १२० :-**

**दुबार असलेली मालमत्ता निर्लेखित करणेबाबत.**

**ठराव क्र. ९८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात येते. तथापी काहीवेळेस नजरचुकीने एकाच मालमत्तेस दोन वेळा कर आकारणी करण्यात येते. व मालमत्ताधारक केवळ एकच मालमत्ता कराचा भरणा करीत असल्याने दुबार असलेल्या मालमत्तेच्या नोंदीमुळे मालमत्ता कराच्या मागणीत वाढ होवून थकबाकी रकमेवर व्याजाची आकारणी होवून मालमत्ता कराच्या मागणीमध्ये नाहक फुगवटा होत असल्याने दुबार नोंद झालेल्या मालमत्तेची नोंद निर्लेखित होणे अपेक्षित आहे.

त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांची दुबार कर आकारणी/दुबार नोंद घेण्यात आली असल्याचे प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवाल व आकारणी व मागणी नोंदवही नुसार दिसुन येत आहे. त्याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

नियमित भरणा करत असलेल्या मालमत्तेचे विवरण

| अ. क्र. | मालमत्ता क्र. | सदनिका क्र. | मालमत्ताधारकाचे नाव | जागा क्षेत्र | करयोग्य मुल्य | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एफ ०६०००९४४३००३ | ६४७ | मे. ॲव्हेन्यु सुपरमार्टस प्रा.लि. | ३१४४४ | १०१८७८६ | २१५९६ |

दुबार झालेल्या व निर्लेखित करावयाच्या मालमत्तेचे विवरण

| अ. क्र. | मालमत्ता क्र. | सदनिका क्र. | मालमत्ताधारकाचे नाव | जागा क्षेत्र | करयोग्य मुल्य | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एफ ०६०००९४४३००२ | ६४७ | मे. ॲव्हेन्यु सुपरमार्टस प्रा.लि. | ३१४४४ | १०१८७८६ | ५८९८५२५ |

सबब प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवाल व आकारणी व मागणी नोंदवहीचे अवलोकन केले असता एकाच मालमत्तेस दुबार नोंद झालेली आहे. व सदर दुबार झालेली नोंद रक्कम वसुल करुन घेण्याजोगी नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १५२ नुसार झालेली रक्कम रु. ५८,९८,५२५/- व रक्कम निर्लेखित होईपर्यंतच्या कालावधीतील व्याज रक्कम निर्लेखित करणे ही सभा मंजूरी देत आहे, तसेच आजतोपावेत ज्या रक्कमा निर्लेखित करावयाच्या आहेत त्याचा सविस्तर अहवालासह प्रस्ताव आवश्यक त्या पुर्ततेसह पुढील सभेत ठेवण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२१, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मासळी मार्केट मधील विक्रेत्यांकडे असलेल्या भाड्याची रक्कम महानगरपालि केच्या धोरणानुसार वसूल करुन उर्वरीत भाड्याची रक्कम निर्लेखित करणेबाबत.**

**वंदना पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात विविध ठिकाणी लहान मार्केट बांधण्यात आलेले असुन त्यामध्ये स्थानिक महिला मासे विक्रीचा व्यवसाय करीता असतात. सद्यस्थितीत गोडदेव, खारीगांव, नवघर, भाईंदर (प.) जय अंबे नगर येथील मार्केट मध्ये मासळी विक्रेते बसतात. मा. महासभा दि. १९-०५-२०१७ ठराव क्र. १८ अन्वये सदर मासळी विक्रेत्यांकडून ठरावापूर्वीची थकबाकी रु. २०/- प्रति महिना या दराने वसुल करुन त्यापुढे रु.२०/- प्रति महिना प्रमाणे भाडे घेण्याबाबत निर्णय झालेला आहे. त्या ठिकाणी तेथील मच्छीमार वीजबील, पाणीबील, देखभाल दुरुस्ती व साफसफाई स्वत करीत आहेत या कारणास्तव त्यांची थकबाकीची रक्कम निर्लेखित करण्यांत येत आहे. मात्र जे विक्रेते महापालिकेचे वीजबील, पाणीबील व देखभाल दुरुस्ती व साफसफाई तेथील मच्छीमार करीत नसतील तर त्यांचे थकबाकीचे भाडे निर्लेखित करण्यांत येऊ नये, असा ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १२१ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मासळी मार्केट मधील विक्रेत्यांकडे असलेल्या भाड्याची रक्कम महानगरपालिकेच्या धोरणानुसार वसूल करुन उर्वरीत भाड्याची रक्कम निर्लेखित करणेबाबत.**

**ठराव क्र. ९९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात विविध ठिकाणी लहान मार्केट बांधण्यात आलेले असुन त्यामध्ये स्थानिक महिला मासे विक्रीचा व्यवसाय करीता असतात. सद्यस्थितीत गोडदेव, खारीगांव, नवघर, भाईंदर (प.) जय अंबे नगर येथील मार्केट मध्ये मासळी विक्रेते बसतात. मा. महासभा दि. १९-०५-२०१७ ठराव क्र. १८ अन्वये सदर मासळी विक्रेत्यांकडून ठरावापूर्वीची थकबाकी रू. २०/- प्रति महिना या दराने वसुल करून त्यापुढे रू.२०/- प्रति महिना प्रमाणे भाडे घेण्याबाबत निर्णय झालेला आहे. त्या ठिकाणी तेथील मच्छीमार वीजबील, पाणीबील, देखभाल दुरुस्ती व साफसफाई स्वत करीत आहेत या कारणास्तव त्यांची थकबाकीची रक्कम निर्लेखित करण्यांत येत आहे. मात्र जे विक्रेते महापालिकेचे वीजबील, पाणीबील व देखभाल दुरुस्ती व साफसफाई तेथील मच्छीमार करीत नसतील तर त्यांचे थकबाकीचे भाडे निर्लेखित करण्यांत येऊ नये, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. वंदना मंगेश पाटील** **अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२२, **ठेका वाहनचालक देयक अदा करणेबाबत.**

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

वरील विषयानुसार सादर करण्यात येत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामाच्या ठेक्यास मुदतवाढ देणे तसेच सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराचे देयक प्रदान करणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८ रोजी विषय ठेवण्यात आला होता. सदर सभेमध्ये प्रकरण क्र. ९० ठराव क्र. ७६ अन्वये सन २०१४ ते २०१८ कालावधी मध्ये जुन्या ठेकेदारांना मुदतवाढ दिलेली असून कोणत्या जाचक अटीमुळे निविदा भरल्या नाहीत. व सदरच्या अटी प्रशासनाने मा. स्थायी अथवा महासभेपुढे ठेवून का शिथिल केल्या नाहीत याबबात खुलास करणे गरजेचे असल्याने सदरचा विषय प्रलंबित ठेवलेला आहे.

सदर निविदेकरिता विभागामार्फत वेळोवेळी कार्यवाही केलेली असून खालीलप्रमाणे निविदा प्रक्रिया केलेली आहे. सदरचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) दि. २४/०८/२०१४ ते २५/०८/२०१५ पर्यंत के. आर. सोनावणे अँड सन्स ठेका.
२) १५/०७/२०१५ पासुन नविन निविदा प्रक्रिया सुरु.
३) २४/०८/२०१५ रोजी मा. आयुक्त सो. यांची निविदा मागविणे करीता मान्यता
४) दि. ०८/०९/२०१५ रोजी ठेका वाहनचालक पुरवठा निविदेस मा.उप.आयुक्त (वाहन) यांची मान्यता
५) दि. १९/०९/२०१५ रोजी मा.आयुक्त सो यांची मुदतवाढीस व आर्थिक प्रशासकिय मंजुरी करीता मान्यता
६) मा.महासभा दि. १५/१०/२०१५ ठराव क्र.७५ अन्वये प्रशासकिय व आर्थिक मंजुरी व मुदतवाढ
७) दि. १८/१०/२०१५ रोजी दै. नवाकाळ व दै. फ्रि. प्रेस जनरल मध्ये प्रसिध्दी
८) परिवहन व वाहन विभागाची एकत्रीत निविदा प्रसिध्दी अंतिम दि. २९/१०/२०१५ पर्यंत निविदा सादर करणे.
९) परिवहन विभागामार्फत वाहतुक अधिक्षक, लिपिक हेल्पर, फिटर, या पदांचा समावेश करुन ADDENDUM (पुरवणी) दि.०६/११/२०१५ पर्यंत मुदतवाढ प्रसिध्दी.
१०) दि.०६/११/२०१५ रोजी प्राप्त ४ निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यास मान्यता
११) दि.०७/११/२०१५ रोजी सिस्टिम मॅनेजर यांना तांत्रिक लिफाफा उघडणेस पत्र.
१२) दि.२७/११/२०१५ रोजी निविदा निवड समितीची बैठक तांत्रिक लिफाफा तपासणी
१३) दि.२७/११/२०१५ रोजी निविदा निवड समितीने छाननी केली असता चार निविदा पैकी एकाच निविदा धारकाने अटीशर्तीची पुर्तता केली असल्याने निविदा प्रक्रिया पुणे होत नाही. म्हणून फेरनिविदा मागविणेस मा.आयुक्त सो. यांची दि.३०/११/२०१५ रोजी मान्यता
१४) दि.१४/१२/२०१५ रोजी धावते नवनगर व दै. मिड-डे चा वृत्तपत्रात फेरनिविदा प्रसिध्द मुदत दि.२८/१२/२०१५ पर्यंत निविदा सादर करणे.

१५) दि.२८/१२/२०१५ पर्यंत दोन व्यतिरिक्त इतर निविदा प्राप्त न झाल्याने दि.०७/०१/२०१६ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली (दै. मिड-डे, नवनगर)
१६) दि.०७/०१/२०१६ पर्यंत दोन व्यतिरिक्त अन्य निविदा प्राप्त झालेले नाही त्यामुळे दै.मिड-डे व दै. नवनगर मध्ये द्वितीय मुदतवाढ देण्यास अंतीम दि.२०/०१/२०१६
१७) दि.२०/०१/२०१६ रोजी द्वितीय मुदतवाढीत ३(तीन) निविदा प्राप्त झाल्याने तांत्रिक लिफाफा उघडणे करीता दि.२२/०१/२०१६ रोजी उप.आयुक्त (वाहन) यांची मान्यता
१८) दि.२२/०१/२०१६ रोजी सिस्टम मॅनेजर यांना तांत्रिक लिफाफा उघणे करीता पत्र.
१९) दि.२२/०१/२०१६ रोजी तांत्रिक लिफाफा उघडला असता कागदपत्राची छाननी केली असता प्राप्त तीनही निविदाधारक पात्र ठरत नाही. निविदेत

नमुद अटीशर्ती प्रमाणे परिपुर्ण निविदा प्राप्त होत नसुन ठेकेदारांना अटीशर्तीचे पालन करता येत नसल्याने, परिवहन व वाहन विभागाची स्वतंत्र निविदा प्रसिध्द करणे करीता मा.आयुक्त सो. यांनी दि.०४/०२/२०१६ रोजी मान्यता दिली

२०) दि.३१/०३/२०१६ रोजी परिवहन विभागास स्वतंत्र निविदा प्रसिध्द करणे करीता पत्र देण्यात आले.
२१) दि.०४/०४/२०१६ रोजी दै. मुंबई चौफेर व दै. आफ्टरनुन चा वृत्तपत्रात फेरनिविदा प्रसिध्द दि.१८/०४/२०१६ अंतिम मुदत.
२२) दि.१८/०४/२०१६ पर्यंत दोनच निविदा प्राप्त झाल्याने मा.उप.आयुक्त (वाहन) यांनी प्रथम मुदतवाढ देणे करीता दि.२६/०४/२०१६ रोजी मान्यता दिली.
२३) दि.२६/०४/२०१६ रोजी प्रथम मुदतवाढ दि.०५/०५/२०१६ पर्यंत
२४) दि.२६/०४/२०१६ रोजी मा. आमदार नरेंद्र मेहता व प्रशांत केळुसकर यांनी नगरसेवक यांनी महानगरपालिकेत होणारे संप व किमान वेतन, पीएफ इ. अडचणी लक्षात घेवून स्पर्धात्मक निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टीने प्रसिध्द केलेल्या निविदेत अतिरीक्त अटीशर्ती नमुद करुन निविदा प्रसिध्द करुन लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले.
२५) त्यानुसार दि.०२/०५/२०१६ रोजी द आफ्टरनुन व दै. मुंबई चौफेर या वृत्तपत्रात अतिरीक्त अटीशर्ती नुसार शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले.
२६) दि.२३/०५/२०१६ पर्यंत शुध्दीपत्रका द्वारे प्रसिध्द केलेल्या निविदेत २ निविदा प्राप्त झाल्या होत्या
२७) निविदा प्रक्रिया पुर्ण होत नसल्याने दि.२७/०५/२०१६ ते ०६/०६/२०१६ पर्यंत वृत्तपत्रात तसेच ऑनलाईन ई-टेंडरिंग द्वारे **प्रथम मुदतवाढ**
२८) दि.२५/०५/२०१६ रोजी दै. मुंबई चौफेर व द अफ्टरनुन या वृत्तपत्रात प्रथम मुदतवाढ प्रसिध्दी
२९) दि.०७/०६/२०१६ पर्यंत मागील दोनच निविदा प्राप्त होत्या
३०) दि.०८/०६/२०१६ रोजी निविदा प्रक्रिया पुर्ण न झाल्याने द्वितीय मुदतवाढ देणेस मा.आयुक्त (वाहन) यांची मान्यता
३१) दि.०८/०६/२०१६ रोजी दै. अफ्टरनुन व दै. मुंबई चौफेर या वृत्तपत्रात द्वितीय मुदतवाढ प्रसिध्द केल्या.
३२) दि.२०/०६/२०१६ पर्यंत दोनच निविदा प्राप्त झाल्याने व नियमानुसार दोन मुदतवाढ दिल्याने तांत्रिक लिफाफा उघडण्या करीता मा.उप.आयुक्त (वाहन) यांचा दि.२३/०६/२०१६ रोजीची मान्यता
३३) दोन निविदांचे तांत्रिक लिफाफे तपासून निविदा निवड समिती समोर ठेवणेस १५/०७/२०१६ रोजी मा.उप.आयुक्त (वाहन) मान्यता
३४) दि.२८/०७/२०१६ रोजी निविदा निवड समिती बैठक न झाल्याने दि. २८/०७/२०१६ रोजी घेण्यात आली
३५) निविदि निवड समिती मार्फत कागदपत्राची छाननी केली असता दोनही निविदा धारकांनी कागदपत्रांची पुर्तता करीत नसल्याने अपात्र ठरविण्यात आले. फेरनिविदा मागविण्यास मान्यता दिली.
३६) संबंधीत निविदेतील ठेकेदार यांनी मा.उप.आयुक्त सो. यांचे भेट घेवून निविदेत नमुद अटिशर्ती बाबत नाराजी व्यक्त करुन अटीशर्ती शिथील करुन निविदा प्रसिध्द केल्यास परीपुर्ण निविदा सादर करणे शक्य होईल याबाबत चर्चा केली.
३७) मा. निविदा निवड समितीचा अहवालानुसार व निविदेतील अटीशर्तीचे शिथिल करुन. फेरनिविदा प्रसिध्द करणेस दि.१२/०९/२०१६ रोजी अहवाल सादर करण्यात आलेला आहे.
३८) मा. आयुक्त सो. यांना अटीशर्ती DMC + MCA + CAO यांनी तयार करून मा. आयुक्त सो. यांची मान्यता घेऊन निविदा प्रसिध्द करणेबाबत आदेश दि. २०/१०/२०१६ रोजी दिले.
३९) दि. २४/१०/२०१६ रोजी अटीशर्ती तयार करून अंतिम मान्यतेसाठी आयुक्तांकडे सादर करण्यात आले.
४०) दि. १८/११/२०१६ रोजी निविदेतील अटीशर्ती पुनश्च तपासून मान्यता देण्यात आली.
४१) मा.उपआयुक्त सो यांच्या आदेशानुसार मनुष्यबळ विविध विभागाकडुन न मागविता एकाच ठिकाणाहून मागवीने करिता मे.एच.आर.एजन्सी मार्फत पुरवठा करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाला पत्र देण्यात आले.

४२) दि.४/१/२०१७ ते दि.३/२/२०१७ पर्यंत शिक्षक मतदार संघाची आचारसंहिता जाहिर झाल्यामुळे निविदा प्रक्रिया आचारसंहिता असल्याने आस्थापना विभागामार्फत प्रलंबित ठेवण्यात आली.

४३) आचारसंहिते नंतर आस्थापना मार्फत विविध विभागात लागणारे आवश्यक कर्मचारी ठेका पध्दतीने संस्थेमार्फत पुरवठा करणे कामी MBMC/GAD/1960/2016-17 Date – 20/02/2017 रोजी ई-टेडरिंगव्दारे तसेच दै. लोकसत्ता व दै. मिड-डे या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

४४) स्थानिक स्वराज्य संस्था कर रद्द झाल्याने महानगरपालिका उत्पन्नात घट झाली असल्याने आस्थापना खर्च ३५% खर्च मर्यादीत आवश्यक असल्याने सदरच्या निविदेवर कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला.

४५) तद्नंतर मा. उप-आयुक्त यांच्या आदेशानुसार सदरची निविदा पुनश्चः वाहन विभागामार्फत मागविणेकरिता आदेश देण्यात आले.

४६) पुनश्च वाहन विभागाने दि. २३/०२/२०१७ रोजी निविदा वृत्तपत्रात तसेच ऑनलाईन प्रसिध्द करून दि. २७/०३/२०१७ पर्यंत निविदा मागविण्यात आली.

४७) वरील कालावधीत ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या, परंतु तांत्रिक लिफाफामधील अटीशर्तीची पुर्तता न केल्याने निविदा पुर्ण झाल्या नाही.

४८) अटीशर्ती प्रमाणे निविदा प्राप्त न झाल्याने ठाणे व कल्याण - डोंबिवली यांचेकडील अटीशर्ती प्रमाणे नविन निविदा तयार करण्यात आल्या.

४९) मा. आयुक्त सो. यांची नविन अटीशर्तीची मान्यता घेऊन दि. २०/०७/२०१८ रोजी पुनश्च निविदा मागविण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून अटीशर्ती शिथिल करणेबाबत विभागाने कार्यवाही केलेली असून ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडील अटीशर्ती प्राप्त करून घेऊन मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने निविदा प्रसिध्द करण्यात आली असून निविदेचा दराचा लिफाफा उघडण्यात आला असून निविदा अंतिम टप्प्यात आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८ ठराव क्र. ७६ मध्ये देयक अदा करणेबाबत उल्लेख नाही. तथापी अटीशर्तीबाबत विभागामार्फत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तथापी मे. के. आर. सोनावणे ॲण्ड सन्स यांनी आजपर्यंत ठेका वाहनचालक पुरवठा खंडीत न करता सेवा चालू ठेवलेली आहे. ठेका वाहनचालक बंद केल्यास महापालिकेच्या विविध अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. वैदयकिय आरोग्य विभागातील रुग्णवाहिका / शववाहिनी, फिरता दवाखाना तसेच अग्निशमन विभागात तीन पाळी मध्ये कार्यरत असलेले रेस्क्यू व्हॅन, वॉटर टेंडर, मिनी वॉटर टेंडर, टँकर, रुग्णवाहिका, जीप, मोबाईल जीप, महिंद्रा पिकअप, महिंद्रा बोलेरो तसेच उदयान व वृक्षप्राधिकरण विभागातील हायड्रोलिक शिडी, टॅक्टर, टेम्पो, जीप वाहने बंद राहिल्यास कार्यालयीन कामकाजावर परिणाम होऊन नागरिकांच्या रोशास सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मे. के.आर.सोनावणे ॲण्ड सन्स यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये विविध विभागात सेवा खंड न करता नियमित किमान वेतनानुसार वाहनचालक पुरवठा करित आहेत. तथापी त्यांना देयक अदा होत नसल्याने अत्यावश्यक सेवेमधील रुग्णवाहिका/शववाहिनी, अग्निशमन विभाग तसेच महापालिकेचे इतर विभाग इ. विभागातील वाहनचालकांना वेतन देणे अडचणीचे झालेले आहे. तसेच पुढील महिन्यात दिवाळी असून बोनस सुध्दा अदा करावयाचे असल्याने थकीत बिले अदा करणे व किमान वेतनातील फरक अदा करणेबाबत कळविले आहे.

तरी ठेकेदार यांना देयक न अदा केल्यास ठेका वाहनचालक पुरवठा बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या मुदतवाढीच्या कालावधीचे देयक अदा करणे तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देईपर्यंत किमान वेतनानुसार मुदतवाढ देणे व मुदतवाढीच्या कालावधीची प्रलंबित देयक अदा करणेस व ठेका वाहनचालक पुरवठा करणेकामी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस व देयक प्रदान करणेस ही सभा मूंजरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, ह्याच्यामध्ये आम्ही मंजूरी दिलेली आहे. हा जो ठेका आहे तो त्वरीत बंद करा. ह्याच्यापूढे ह्यांना आम्ही एक्स्टेंशन देणार नाही. नविन ठेकेदारांना कार्यादेश लवकरात लवकर द्या.

**प्रकरण क्र. १२२ :-**

**ठेका वाहनचालक देयक अदा करणेबाबत.**

**ठराव क्र. १०० :-**

वरील विषयानुसार सादर करण्यात येत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामाच्या ठेक्यास मुदतवाढ देणे तसेच सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराचे देयक प्रदान करणेबाबत मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८ रोजी विषय ठेवण्यात आला होता. सदर सभेमध्ये प्रकरण क्र. ९० ठराव क्र. ७६ अन्वये सन २०१४ ते २०१८ कालावधी मध्ये जुन्या ठेकेदारांना मुदतवाढ दिलेली असून कोणत्या जाचक अटीमुळे निविदा भरल्या नाहीत. व सदरच्या अटी प्रशासनाने मा. स्थायी अथवा महासभेपुढे ठेवून का शिथिल केल्या नाहीत याबबात खुलास करणे गरजेचे असल्याने सदरचा विषय प्रलंबित ठेवलेला आहे.

सदर निविदेकरिता विभागामार्फत वेळोवेळी कार्यवाही केलेली असून खालीलप्रमाणे निविदा प्रक्रिया केलेली आहे. सदरचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) दि. २४/०८/२०१४ ते २५/०८/२०१५ पर्यंत के. आर. सोनावणे अँड सन्स ठेका.
२) १५/०७/२०१५ पासुन नविन निविदा प्रक्रिया सुरु.
३) २४/०८/२०१५ रोजी मा. आयुक्त सो. यांची निविदा मागविणे करीता मान्यता
४) दि. ०८/०९/२०१५ रोजी ठेका वाहनचालक पुरवठा निविदेस मा.उप.आयुक्त (वाहन) यांची मान्यता
५) दि. १९/०९/२०१५ रोजी मा.आयुक्त सो यांची मुदतवाढीस व आर्थिक प्रशासकिय मंजुरी करीता मान्यता
६) मा.महासभा दि. १५/१०/२०१५ ठराव क्र.७५ अन्वये प्रशासकिय व आर्थिक मंजुरी व मुदतवाढ
७) दि. १८/१०/२०१५ रोजी दै. नवाकाळ व दै. फ्रि. प्रेस जनरल मध्ये प्रसिध्दी
८) परिवहन व वाहन विभागाची एकत्रीत निविदा प्रसिध्दी अंतिम दि. २९/१०/२०१५ पर्यंत निविदा सादर करणे.
९) परिवहन विभागामार्फत वाहतुक अधिक्षक, लिपिक हेल्पर, फिटर, या पदांचा समावेश करुन ADDENDUM (पुरवणी) दि.०६/११/२०१५ पर्यंत मुदतवाढ प्रसिध्दी.
१०) दि.०६/११/२०१५ रोजी प्राप्त ४ निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यास मान्यता
११) दि.०७/११/२०१५ रोजी सिस्टिम मॅनेजर यांना तांत्रिक लिफाफा उघडणेस पत्र.
१२) दि.२७/११/२०१५ रोजी निविदा निवड समितीची बैठक तांत्रिक लिफाफा तपासणी
१३) दि.२७/११/२०१५ रोजी निविदा निवड समितीने छाननी केली असता चार निविदा पैकी एकाच निविदा धारकाने अटीशर्तीची पुर्तता केली असल्याने निविदा प्रक्रिया पुणे होत नाही. म्हणून फेरनिविदा मागविणेस मा.आयुक्त सो. यांची दि.३०/११/२०१५ रोजी मान्यता
१४) दि.१४/१२/२०१५ रोजी धावते नवनगर व दै. मिड-डे चा वृत्तपत्रात फेरनिविदा प्रसिध्द मुदत दि.२८/१२/२०१५ पर्यंत निविदा सादर करणे.
१५) दि.२८/१२/२०१५ पर्यंत दोन व्यतिरिक्त इतर निविदा प्राप्त न झाल्याने दि.०७/०१/२०१६ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली (दै. मिड-डे, नवनगर)
१६) दि.०७/०१/२०१६ पर्यंत दोन व्यतिरिक्त अन्य निविदा प्राप्त झालेले नाही त्यामुळे दै.मिड-डे व दै. नवनगर मध्ये द्वितीय मुदतवाढ देण्यास अंतीम दि.२०/०१/२०१६
१७) दि.२०/०१/२०१६ रोजी द्वितीय मुदतवाढीत ३(तीन) निविदा प्राप्त झाल्याने तांत्रिक लिफाफा उघडणे करीता दि.२२/०१/२०१६ रोजी उप.आयुक्त (वाहन) यांची मान्यता
१८) दि.२२/०१/२०१६ रोजी सिस्टम मॅनेजर यांना तांत्रिक लिफाफा उघणे करीता पत्र.
१९) दि.२२/०१/२०१६ रोजी तांत्रिक लिफाफा उघडला असता कागदपत्राची छाननी केली असता प्राप्त तीनही निविदाधारक पात्र ठरत नाही. निविदेत

    नमुद अटीशर्ती प्रमाणे परिपुर्ण निविदा प्राप्त होत नसुन ठेकेदारांना अटीशर्तीचे पालन करता येत नसल्याने, परिवहन व वाहन विभागाची स्वतंत्र निविदा प्रसिध्द करणे करीता मा.आयुक्त सो. यांनी दि.०४/०२/२०१६ रोजी मान्यता दिली
२०) दि.३१/०३/२०१६ रोजी परिवहन विभागास स्वतंत्र निविदा प्रसिध्द करणे करीता पत्र देण्यात आले.
२१) दि.०४/०४/२०१६ रोजी दै. मुंबई चौफेर व दै. आफ्टरनुन चा वृत्तपत्रात फेरनिविदा प्रसिध्द दि.१८/०४/२०१६ अंतिम मुदत.
२२) दि.१८/०४/२०१६ पर्यंत दोनच निविदा प्राप्त झाल्याने मा.उप.आयुक्त (वाहन) यांनी प्रथम मुदतवाढ देणे करीता दि.२६/०४/२०१६ रोजी मान्यता दिली.
२३) दि.२६/०४/२०१६ रोजी प्रथम मुदतवाढ दि.०५/०५/२०१६ पर्यंत

२४) दि.२६/०४/२०१६ रोजी मा. आमदार नरेंद्र मेहता व प्रशांत केळुसकर यांनी नगरसेवक यांनी महानगरपालिकेत होणारे संप व किमान वेतन, पीएफ इ. अडचणी लक्षात घेवून स्पर्धात्मक निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टीने प्रसिध्द केलेल्या निविदेत अतिरीक्त अटीशर्ती नमुद करुन निविदा प्रसिध्द करुन लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले.

२५) त्यानुसार दि.०२/०५/२०१६ रोजी द आफ्टरनुन व दै. मुंबई चौफेर या वृत्तपत्रात अतिरीक्त अटीशर्ती नुसार शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले.

२६) दि.२३/०५/२०१६ पर्यंत शुध्दीपत्रका द्वारे प्रसिध्द केलेल्या निविदेत २ निविदा प्राप्त झाल्या होत्या

२७) निविदा प्रक्रिया पुर्ण होत नसल्याने दि.२७/०५/२०१६ ते ०६/०६/२०१६ पर्यंत वृत्तपत्रात तसेच ऑनलाईन ई-टेंडरिंग द्वारे **प्रथम मुदतवाढ**

२८) दि.२५/०५/२०१६ रोजी दै. मुंबई चौफेर व द अफ्टरनुन या वृत्तपत्रात प्रथम मुदतवाढ प्रसिध्दी

२९) दि.०७/०६/२०१६ पर्यंत मागील दोनच निविदा प्राप्त होत्या

३०) दि.०८/०६/२०१६ रोजी निविदा प्रक्रिया पुर्ण न झाल्याने द्वितीय मुदतवाढ देणेस मा.आयुक्त (वाहन) यांची मान्यता

३१) दि.०८/०६/२०१६ रोजी दै. अफ्टरनुन व दै. मुंबई चौफेर या वृत्तपत्रात द्वितीय मुदतवाढ प्रसिध्द केल्या.

३२) दि.२०/०६/२०१६ पर्यंत दोनच निविदा प्राप्त झाल्याने व नियमानुसार दोन मुदतवाढ दिल्याने तांत्रिक लिफाफा उघडण्या करीता मा.उप.आयुक्त (वाहन) यांचा दि.२३/०६/२०१६ रोजीची मान्यता

३३) दोन निविदांचे तांत्रिक लिफाफे तपासून निविदा निवड समिती समोर ठेवणेस १५/०७/२०१६ रोजी मा.उप.आयुक्त (वाहन) मान्यता

३४) दि.२८/०७/२०१६ रोजी निविदा निवड समिती बैठक न झाल्याने दि. २८/०७/२०१६ रोजी घेण्यात आली

३५) निविदि निवड समिती मार्फत कागदपत्राची छाननी केली असता दोनही निविदा धारकांनी कागदपत्रांची पुर्तता करीत नसल्याने अपात्र ठरविण्यात आले. फेरनिविदा मागविण्यास मान्यता दिली.

३६) संबंधीत निविदेतील ठेकेदार यांनी मा.उप.आयुक्त सो. यांचे भेट घेवून निविदेत नमुद अटिशर्ती बाबत नाराजी व्यक्त करुन अटीशर्ती शिथील करुन निविदा प्रसिध्द केल्यास परीपुर्ण निविदा सादर करणे शक्य होईल याबाबत चर्चा केली.

३७) मा. निविदा निवड समितीचा अहवालानुसार व निविदेतील अटीशर्तीचे शिथिल करुन. फेरनिविदा प्रसिध्द करणेस दि.१२/०९/२०१६ रोजी अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

३८) मा. आयुक्त सो. यांना अटीशर्ती DMC + MCA + CAO यांनी तयार करून मा. आयुक्त सो. यांची मान्यता घेऊन निविदा प्रसिध्द करणेबाबत आदेश दि. २०/१०/२०१६ रोजी दिले.

३९) दि. २४/१०/२०१६ रोजी अटीशर्ती तयार करून अंतिम मान्यतेसाठी आयुक्तांकडे सादर करण्यात आले.

४०) दि. १८/११/२०१६ रोजी निविदेतील अटीशर्ती पुनश्च तपासून मान्यता देण्यात आली.

४१) मा.उपआयुक्त सो यांच्या आदेशानुसार मनुष्यबळ विविध विभागाकडुन न मागविता एकाच ठिकाणाहून मागवीने करिता मे.एच.आर.एजन्सी मार्फत पुरवठा करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाला पत्र देण्यात आले.

४२) दि.४/१/२०१७ ते दि.३/२/२०१७ पर्यंत शिक्षक मतदार संघाची आचारसंहिता जाहिर झाल्यामुळे निविदा प्रक्रिया आचारसंहिता असल्याने आस्थापना विभागामार्फत प्रलंबित ठेवण्यात आली.

४३) आचारसंहिते नंतर आस्थापना मार्फत विविध विभागात लागणारे आवश्यक कर्मचारी ठेका पध्दतीने संस्थेमार्फत पुरवठा करणे कामी MBMC/GAD/1960/2016-17 Date – 20/02/2017 रोजी ई-टेडरिंगव्दारे तसेच दै. लोकसत्ता व दै. मिड-डे या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

४४) स्थानिक स्वराज्य संस्था कर रद्द झाल्याने महानगरपालिका उत्पन्नात घट झाली असल्याने आस्थापना खर्च ३५% खर्च मर्यादीत आवश्यक असल्याने सदरच्या निविदेवर कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला.

४५) तद्नंतर मा. उप-आयुक्त यांच्या आदेशानुसार सदरची निविदा पुनश्चः वाहन विभागामार्फत मागविणेकरिता आदेश देण्यात आले.

४६) पुनश्च वाहन विभागाने दि. २३/०२/२०१७ रोजी निविदा वृत्तपत्रात तसेच ऑनलाईन प्रसिध्द करून दि. २७/०३/२०१७ पर्यंत निविदा मागविण्यात आली.

४७) वरील कालावधीत ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या, परंतु तांत्रिक लिफाफामधील अटीशर्तीची पुर्तता न केल्याने निविदा पुर्ण झाल्या नाही.

४८) अटीशर्ती प्रमाणे निविदा प्राप्त न झाल्याने ठाणे व कल्याण - डोंबिवली यांचेकडील अटीशर्ती प्रमाणे नविन निविदा तयार करण्यात आल्या.

४९) मा. आयुक्त सो. यांची नविन अटीशर्तीची मान्यता घेऊन दि. २०/०७/२०१८ रोजी पुनश्च निविदा मागविण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून अटीशर्ती शिथिल करणेबाबत विभागाने कार्यवाही केलेली असून ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडील अटीशर्ती प्राप्त करून घेऊन मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने निविदा प्रसिध्द करण्यात आली असून निविदेचा दराचा लिफाफा उघडण्यात आला असून निविदा अंतिम टप्प्यात आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८ ठराव क्र. ७६ मध्ये देयक अदा करणेबाबत उल्लेख नाही. तथापी अटीशर्तीबाबत विभागामार्फत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तथापी मे. के. आर. सोनावणे ॲण्ड सन्स यांनी आजपर्यंत ठेका वाहनचालक पुरवठा खंडीत न करता सेवा चालू ठेवलेली आहे. ठेका वाहनचालक बंद केल्यास महापालिकेच्या विविध अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. वैदयकिय आरोग्य विभागातील रुग्णवाहिका / शववाहिनी, फिरता दवाखाना तसेच अग्निशमन विभागात तीन पाळी मध्ये कार्यरत असलेले रेस्क्यू व्हॅन, वॉटर टेंडर, मिनी वॉटर टेंडर, टँकर, रुग्णवाहिका, जीप, मोबाईल जीप, महिंद्रा पिकअप, महिंद्रा बोलेरो तसेच उदयान व वृक्षप्राधिकरण विभागातील हायड्रोलिक शिडी, टॅक्टर, टेम्पो, जीप वाहने बंद राहिल्यास कार्यालयीन कामकाजावर परिणाम होऊन नागरिकांच्या रोशास सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मे. के.आर.सोनावणे ॲण्ड सन्स यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये विविध विभागात सेवा खंड न करता नियमित किमान वेतनानुसार वाहनचालक पुरवठा करित आहेत. तथापी त्यांना देयक अदा होत नसल्याने अत्यावश्यक सेवेमधील रुग्णवाहिका/शववाहिनी, अग्निशमन विभाग तसेच महापालिकेचे इतर विभाग इ. विभागातील वाहनचालकांना वेतन देणे अडचणीचे झालेले आहे. तसेच पुढील महिन्यात दिवाळी असून बोनस सुध्दा अदा करावयाचे असल्याने थकीत बिले अदा करणे व किमान वेतनातील फरक अदा करणेबाबत कळविले आहे.

तरी ठेकेदार यांना देयक न अदा केल्यास ठेका वाहनचालक पुरवठा बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या मुदतवाढीच्या कालावधीचे देयक अदा करणे तसेच निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नविन ठेकेदारास कार्यादेश देईपर्यंत किमान वेतनानुसार मुदतवाढ देणे व मुदतवाढीच्या कालावधीची प्रलंबित देयक अदा करणेस व ठेका वाहनचालक पुरवठा करणेकामी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस व देयक प्रदान करणेस ही सभा मूंजरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२३, **स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत.**

**मोहन म्हात्रे :-**

स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर सद्या ५ ऑडिट लिपीक या पदावर किमान वेतन १५,३९३/- या ठोक मानधनावर कार्यरत आहेत. ५ ऑडिट लिपीक यांची मुदत दि. १६-०८-२०१८ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कर्मचा-यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | मुदत संपण्याची दिनांक | नवीकरण कालावधी |
|---|---|---|---|
| १ | सचिन सुपूगडे | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| २ | सुशांत सुर्वे | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| ३ | हेमाली बावकर | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| ४ | रविनाथ शिवगण | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| ५ | निशा पटेल | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |

सदरचे ऑडिट लिपीक सद्यस्थितीत स्थानिक संस्था कर विभागात काम करत नसुन पालिकेच्या इतरत्र विभागात कार्यरत आहेत. स्थानिक संस्था कराची मागील वसुली शिल्लक आहे किंवा कसे याचा अहवाल घेवून व या ऑडीत लिपीकांची आवश्यकता आहे किंवा कसे या बाबतचा लेखी अहवाल घेण्यात यावा. तोपर्यंत सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानूशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, ह्या विषयावर मागच्या स्टॅंडींग कमिटीमध्ये चर्चा करण्यात आली होती त्यावेळी एक्स्टेंशन दिले होते. तेव्हाचे तत्कालीन सभापती ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी प्रश्न विचारला होता की, एल.बी.टी. करीत ज्या कर्मचाऱ्याची नेमणूक केलेली आहे. त्याच्या मार्फत आपल्या एल.बी.टी. ची किती वसूली झाली आहे. त्याच्यामध्ये काय डेव्हलपमेंट आहे की नाही. किती वसूली झाली त्याची आम्हाला माहिती देण्यात यावी. मा. आयुक्त साहेब, आपण ठेक्याव्दारे ज्या अधिकारी कर्मचाऱ्याची नेमणूक केलेली आहे. मी मागे पण आस्थापनेच्या अधिकाऱ्यांना विचारले होते की, आपल्याकडे किती मंजूर रिक्त पदे आहेत. जी पदे मंजूर झाली आहेत आणि रिक्त आहेत त्याची आम्हाला माहिती देण्यात यावी आणि जी रिक्त पदे आहेत ती मंजूर करण्याची प्रक्रिया करण्यात यावी. तसे तुम्ही निर्देश द्या.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

२०१७-१८ मध्ये २ लाख, ६१ हजार, ६५७ वसूली झाली.

**अविनाश जाधव :-**

दोनच माणस सध्या कार्यरत आहेत. बाकी आरोग्य विभाग, शिक्षण विभागात आपण पत्र व्यवहार करतो आणि नोटीसा पाठवतो, पण लोकांचा रिस्पॉन्स नाही.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

एकूण १४२० हे कर निर्धारणाचे आपल्याकडे बाकी आहेत का? त्यातले निर्धारण केलेल्या व्यापाऱ्यांकडून २०१७-१८ मध्ये २ लाख, ६१ हजार, ६५७ आलेले आहे. २०१६-१७ मध्ये आपल्याकडे जवळपास ६ लाख, ८७ हजार होते. पण तो सरकारने जुलै २०१७ पासुन बंद केल्यामुळे आता आपण त्याच्याकडे करत नाही. म्हणून आपल्याला एक बॅंक डेटेड कर निर्धारणाचे आदेश काढु नये. म्हणुन सुचना दिलेल्या आहेत. परंतु त्याच्याबद्दल अन्य महापालिकाकडून आम्ही माहिती घेतलेली आहे. त्याच्यात नाशिक, नवी मुंबई महानगरपालिका यांनी शासनाकडे करस्पॉन्डन्स केलेल आहे. याच्यामध्ये आपल्या महसूली उत्पन्नामध्ये घट होणार आहे. आणि त्याबाबत त्यांनी निदर्शनास आणलेल आहे. म्हणुन आपण सुद्धा आपल्या महानगरपालिके तर्फे शासनाला पत्र तयार केलेलं आहे. शासनाने मध्ये आपल्याला सूचना केल्या होत्या की, तुम्ही स्थानिक संस्था कराच्या निर्धारणासाठी शासनाने दिलेली मुदत ३१ मार्च २०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे ३१ मार्च किंवा त्यापूर्वीच्या दिनांकाने निर्धारण आदेश व्यापारी ज्या उद्योजकांना पाठवले जात आहेत किंवा कसे याबाबत महानगरपालिकेने तपासणी करावी आणि अशी कार्यवाही नियमानुकूल नसल्याने मागील दिनांकाने निर्धारण आदेश पाठवले जाणार नाही याची दक्षत घेण्यात यावी. याबाबत अन्य महानगरपालिकेनी शासनाकडे रिप्रेझेन्टेशन दिलेलं आहे. आपण सुद्धा करतो. त्याच्यामध्ये असं म्हटलेल आहे. अशी मुदतवाढ जी ३१ मार्च २०१८ नंतर मिळवली आहे, परंतु जी अशी महानगरपालिकेच्या अभय योजनेतील काही प्रकरण प्रलंबित आहेत. त्यामुळे आम्हाला ती पूर्ण करण्यासाठी शासनाकडून मुदतवाढ येते. हे कर निर्धारण करण्यासाठी बाकी महापालिकांना मागणी मिळेल तशी त्यामुळे आपल्याला ह्याची गरज लागणार आहे. प्लस आपण सेल्स टॅक्स मधली जी अनुभवी लोक आहेत. यांची सुद्धा मदत आपण घेणार आहोत. त्याच्याबद्दलचे रिटायर्ड सेल्स टॅक्सचे डी.पी. कमिशनर वगैरे आहेत, असिस्टन्ट कमिशनर आहेत. तर त्यांचे आपण अर्ज मागवले होते. त्यांना याबाबतीत ते तज्ञ असल्यामूळे आपण त्यांच्या स्टाफ मधून निर्धारण करणे. ज्या लोकांनी विवरण पत्रच भरली नाही त्यांचे असेसमेंट करण्यासाठी उपाययोजना करावी लागणार आहेत. त्यांनी जी दरवर्षी आपल्याला विवरणपत्र द्यावयाची होती, ती व्यापाऱ्याने दिली नाहीत. ती दिली नाहीत तर काय प्रोसिजर करायची ह्याबद्दलचे तज्ञ व्यक्तिकडून आपण मार्गदर्शन घेतो. त्यामुळे आपल्याला बाकीचे लोक पण लागणार आहेत. त्यामुळे मुदतवाढ द्यावी अशी आमची विनंती आहे.

**मा. सभापती :-**

साहेब मुदतवाढ द्यायची ठीक आहे, पण मागचे ६ महिने त्याच्यात आपले इन्कम अडीज लाख म्हणजे अर्थ काय? आपण त्यांना पगार किती देतो. त्याच्या सॅलरीचे कॅल्क्यूलेशन करा आणि आपल्याला आलेल्या इन्कमचे कॅल्क्यूलेशन करा, ह्यामध्ये महानगरपालिकेचे नुकसान होते. ते तुम्ही बघा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आपल्याकडे जी.एस.टी. लागू झाला तरी एल.बी.टी. डिपार्टमेंट कम्पलीट बंद झाले नाही. कॉम्पेसेटरी अनुदान येते. त्या अनुषंगाने शासनाला काही माहिती पाठवावी लागते. त्याच्यामध्ये वेगवेगळे तपशील आहेत.

लेखे निर्धारण करणे माहिती अधिकार, पी.जी.पोर्टल, सी.एम.पोर्टल, लोकशाही दिन, शासकीय पत्रव्यवहार, लोक प्रतिनिधी पत्रव्यवहार, कार्यालयीन पत्रव्यवहार, अंतर्गत लेखापरिक्षण, लोकल फंडचे ऑडीट होईल. कालपासून ऑडीट चालू झाले. ५०० फाईल आहेत. ४-५ महिने तो स्टाफ इथे राहणार आहे. त्यासाठी ज्या फाईल आहेत त्या काढून द्याव्या लागतील. त्यामुळे ६ महिने ह्यांची आवश्यकता आहेत. जकात संबंधाची काही मॅटर असतील त्या फाईल काढुन देणे. बँकेचे रिकन्सेलेशन पूर्वी २१ बँक अकाउन्ट होते. त्या बँकेचे अकाउन्ट क्लोज करायला घेतले, काही बंद केले, अजून बाकी आहेत. ती सुद्धा फायनल करून क्लोज करणार आहोत. मुद्रांक शुल्का बद्दलची आपल्याला माहिती आहे. जी.एस.टी. बद्दल पूर्वी आपण कट करत नव्हतो. आता आपण कट करतो आणि अनुदान मिळण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करायला लागतो. त्यासाठी ही मुल लागतात.

**मा. सभापती :-**

सध्या हे कर्मचारी वेगवेगळ्या विभागामध्ये कार्यरत आहेत. मग ह्यांचा उपयोग कसा करणार?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्यांना ह्या विभागामध्ये काम करायला सांगितले आहे. बाकीच्या विभागाला दोन तास ते त्या विभागात काम करु शकतात. ऑडीट रिलेटेड स्पेशल टाईपचे काम आहे. अकाउन्ट रिलेटेड ह्या विषयाचा त्या मुलाकडे अनुभव आहे म्हणुन त्यांना मुदतवाढ द्यावी.

**मा. सभापती :-**

आमची हीच अपेक्षा आहे की, आपण जे कर्मचारी नेमतो त्याच्याकडून सर्व संबंधीत कामे करून घ्यावे आणि महानगरपालिकेचा कसा फायदा करता येईल ते बघा. उगाच ते पैसे भेटत नाही, फायदा होत नाही आणि ह्यांना एक्स्टेंशन द्यायचे, माणुसकीच्या नात्याने द्यायचे, त्या मताचा मी आहे. पण महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून बघायला गेले तर तो पण आपल्याला विचार केला पाहिजे. पूढच्या मिटींगमध्ये ह्याचा विचार करू.

**प्रकरण क्र. १२३ :-**

**स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत.**

**ठराव क्र. १०१ :-**

स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर सद्या ५ ऑडिट लिपीक या पदावर किमान वेतन १५,३९३/- या ठोक मानधनावर कार्यरत आहेत. ५ ऑडिट लिपीक यांची मुदत दि. १६-०८-२०१८ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कर्मचा-यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | मुदत संपण्याची दिनांक | नवीकरण कालावधी |
|---|---|---|---|
| १ | सचिन सुपूगडे | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| २ | सुशांत सुर्वे | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| ३ | हेमाली बावकर | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| ४ | रविनाथ शिवगण | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |
| ५ | निशा पटेल | दि. १६-०८-२०१८ | दि. २०-८-२०१८ ते दि. १९-२-२०१९ |

सदरचे ऑडिट लिपीक सद्यस्थितीत स्थानिक संस्था कर विभागात काम करत नसुन पालिकेच्या इतरत्र विभागात कार्यरत आहेत. स्थानिक संस्था कराची मागील वसुली शिल्लक आहे किंवा कसे याचा अहवाल घेवून व या ऑडीत लिपीकांची आवश्यकता आहे किंवा कसे या बाबतचा लेखी अहवाल घेण्यात यावा. तोपर्यंत सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे　　　　अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२४, **मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रातील विविध उद्यान / तलाव येथील कारंजे (फाऊंटन) वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

**वंदना पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील **विविध उद्यान / तलाव येथे कारंजे (फाउंटन)** नादुरुस्त झाल्याने सुस्थितीत करणेकामी मा. श्री. मदन उदितनारायण सिंह, सभापती – प्रभाग समिती क्र. ३ यांनी दि. ३०-७-२०१८ रोजीच्या पत्रानुसार मागणी केलेली आहे. सदर कामी रू. ३९,३५,७२२/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी सार्वजनिक उद्याने (विद्युत दुरुस्ती) या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती मिरा भाईंदर मे कितने फाऊंटन है और किधर किधर है।

**दिपक खांबित :-**

फाऊंटन हर एक तलाव में है।

**राजीव मेहरा :-**

कहाँ पे है।

**दिपक खांबित :-**

गोडदेव, पेणकरपाडा, राई, मुर्धा, मोरवा पाच तलाव में है।

**राजीव मेहरा :-**

उसमें मेन्टेनन्स क्या आएगा? आपने लास्ट ३९ बोला है। यह तलाव कभी से है।

**दिपक खांबित :-**

यह सब अलग अलग टाईम में बिठाए है।

**राजीव मेहरा :-**

मोटर्स की कॅपेसिटी क्या है, समर्जिबल पंप लगता है।

**दिपक खांबित :-**

जो भी रिपेयरिंग का काम रहता है, जो भी आयटम रहते है।

**राजीव मेहरा :-**

फाऊंटन के लिए मेन क्या लगता है? समर्जिबल पंप जिसकी लाईफ ५-६ साल है।

**दिपक खांबित :-**

उसके नोझल्स रहते है। अलग अलग डिझाईन की पुरी वायरिंग रहती है। बारीश के टाईम में पुरे मेन्टेन करने पडते है। सालभर उसका मेन्टेनन्स होता है। २ महिने में एक बार आदमी आता है। उसका नोझल निकालके साफ करते है।

**राजीव मेहरा :-**

अगर हमारे तालाब क्लिन है, तो नोझल साफ करने की नौबत नही आती है।

**दिपक खांबित :-**

साफ तो करने पडते है। तालाब क्लिन नहीं रहते है।

**राजीव मेहरा :-**

तालाब नॅचरल है, वह मेन्टेन नही होते है..........

**दिपक खांबित :-**

यह जो आयटम है वह ४५ आयटम है। जो भी आयटम पे खर्चा होता है।

**राजीव मेहरा :-**

उसका बॅकअप लेना चाहिए। क्या-क्या है।

**दिपक खांबित :-**

बॅकअप नही रहता है।

**राजीव मेहरा :-**

गियर ॲन्ड टियर कितना होता है।

**दिपक खांबित :-**

मिटींग के सामने जो इस्टीमेट है वह रखा जाता है। अगर डिटेल चाहिए तो डिपार्टमेंट में रहता है। आप कभी भी आके देख सकते है।

**राजीव मेहरा :-**

ठीक है।

**तारा घरत :-**

जो कारंज टोटल लॉस झाला असेल त्याचे काय? त्याच्यामध्ये काहीच राहिले नाही.

**दिपक खांबित :-**

तो आपण करुन घेऊ.

**अनिता पाटील :-**

देखभालीसाठी रक्कम खर्च करीत असाल तर तूटेपर्यंत वाट कशाला बघता. ते मेन्टेनन्स करत नाही का? त्याची वर्षभर देखभाल करत नाही का? तुम्ही दरवर्षी टेंडर काढता.

**दिपक खांबित :-**

तो तलाव २-३ वर्षापूर्वी पूर्ण डेव्हलप केला. त्यासाठी तो खाली केला आणि नविन डेव्हलप केला त्यासाठी जास्त नुकसान झाले.

**अनिता पाटील :-**

नुकसान झाले पण तुमचे वर्षाचे बजेट असेल तुटेपर्यंत वाट न बघता बनवायला पाहिजे होते.

**दिपक खांबित :-**

पूर्ण खराब झाला नाही तो चालू करुन घेऊ.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**दिप्ती भट :-**

रिपेयरींगची जी निविदा काढली मग ऑर्डर दिल्यावर रिपेयरिंग व्हायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे १०० टक्के झाली पाहिजे.

**दिप्ती भट :-**

एप्रिलमध्ये व्यायामाची साधन आणि खेळणी रिपेयरींगसाठी ऑर्डर दिलेली असून त्या कॉन्ट्रॅक्टरला ऑर्डर दिली नाही. मे महिन्यामध्ये मुल खेळापासून वंचित राहिले. व्यायामाची साधन सर्व खेळणी तुटली आहेत. अजून रिपेयरींग झाले नाही. वन विभागामधून कोण मिटींगसाठी आले नाही.

**अनिता पाटील :-**

माझ्या पण वॉर्डमध्ये सेम प्रकार आहे. लावल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ते इन्स्ट्रूमेंट तुटले. वारंवार मेश्राम साहेब आणि पानपट्टे साहेबांना तक्रार केली. परंतु अजून ते दुरुस्त केले नाही. त्याच्यातले दोन पार्ट घेऊन गेले परत आले नाही आणि जे इन्स्ट्रूमेंट लावले आहेत ते सर्व नादुरुस्त आहेत.

**वंदना पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते माझ्या वॉर्डमध्ये गार्डन आहे. त्यासाठी एक लेटर दिले आहे. ८ महिने झाले तिकडे खेळणी बसवली आहेत. तिकडे मॅट बसवले जावे. कारण एखादा मुलगा पडला तर त्याला दुखापत होऊ नये म्हणून मी मॅटसाठी पत्र दिले आहे. ती प्रोसिजर अजून झाली नाही का?

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब सन्मा सदस्यांनी ज्या त्यांच्या समस्या सांगितल्या आहेत. त्याच्यावर त्वरीत कारवाई करण्यात यावी असा मी आदेश देतो. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १२४ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यान / तलाव येथील कारंजे (फाऊंटन) वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत**

**ठराव क्र. १०२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील **विविध उद्यान / तलाव येथे कारंजे (फाउंटन)** नादुरूस्त झाल्याने सुस्थितीत करणेकामी मा. श्री. मदन उदितनारायण सिंह, सभापती – प्रभाग समिती क्र. ३ यांनी दि. ३०-७-२०१८ रोजीच्या पत्रानुसार मागणी केलेली आहे. सदर कामी रू. ३९,३५,७२२/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी सार्वजनिक उद्याने (विद्युत दुरूस्ती) या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. वंदना मंगेश पाटील अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२५, **मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला सर्व्हेक्षण बाबतची निविदा मा. स्थायी समितीसमोर ठेवणेबाबत.**

**निला सोंस :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्याचे सर्वेक्षण करणे कामी ॲनलाईन ई-टेंडरींद्वारे तसेच "मुंबई ल्खदीप" तसेच "सर्वश्रेष्ठ राजसत्ता" या वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा दि. ७-०९-२०१८ ते १८-०९-२०१८ पयंत मागविण्यात आल्या होत्या. सदर मुदतीत एकूण ०२ निविदा प्राप्त झाल्या असल्यामुळे सदर निविदेस दि. २७-०९-२०१८ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली. सदर मुदतवाढीमध्ये बीड कंउंटपेज वरुन एकूण ०५ निविदा प्राप्त झाल्याचे दिसुन येत आहे. सदर निविदाधारकांनी निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे सादर केली असुन सदर निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड उघडले असता त्यांनी खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

| अ. क्र. | तपशील | साय आय टी रिसोर्स लि. | मार्क इंटरप्रायजेस | अर्थव प्लानिंग ॲन्ड रिर्सच प्रा.लि. | ऑल इंडिया इंन्स्टिटयूट ऑफ लोक सेल्फ गर्व. | मॅगोज इंटप्रायजेस | मॅगोज इंटप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेल दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सादर केलेले दर | १५३/- | १४९.५०/- | १७५.५२/- | २७६/- | ११८/- | ११४/- |

वरील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे मॅगोज इंटरप्रायजेस यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सदर दरामध्ये वाटाघाटी केली असता मॅगोज इंटप्रायजेस यांनी खालील प्रमाणे दर मान्य केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशील | मॅगोज इंटप्रायजेस | मॅगोज इंटप्रायजेस यांनी वाटाघाती अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | सादर केलेले दर | ११८/- | ११४/- |

वरील तक्त्यात नमूद दर पाहता मॅगोज इंटप्रायजेस यांनी सादर केलेले दर इतर निविदाधारकांनी सादर केलेल्या दरापेक्षा कमी आहेत. तसेच दि.अं.यो.रा.ना.उ.अ./च्छच्ज/का-१६/२०१८-१९/२१५७ दि. १५-०६-२०१८ रोजी नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी प्रती विक्रेता रू. १५०/- खर्चाची मर्यादा निश्चित करून दिली आहे. तसेच सदर सर्वेक्षण कामी निधी नगर परिषद प्रशासन संचालनालय यांचेकडून प्राप्त होणार आहे. तरी मार्क इंटरप्रायजेस यांनी सादर केलेल्या दराबाबत तुलना केली असता सदरचे दर वाजवी आहेत. तरी कमी दराच्या निविदा मा. स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्र.**

सदरचा विषयबाबत सन्माननीय सदस्यांच्या सुचना व तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अहवाल तसेच संपूर्ण माहितीसह फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाचा प्रश्न आहे सर्वेक्षण कामी निधी नगरपरिषद प्रशासन संचालनालय हा काय विषय आहे.

**दिपाली पोवार :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलते, सध्याचे जे फेरिवाला सर्वेक्षण आहे. हे डी.एम.ए. ची स्किम आहे. एन.यू.एल.एम. ह्याच्या अंतर्गत होते. त्याचा निधी डी.एम.ए. अंतर्गत आपल्याला मिळणार आहे. १५ जूनच्या पत्रानुसार खर्चाची मर्यादा प्रती लाभार्थी १५० झालेली आहे. आपल्या निविदेचा रेट ११४ आहे.

**जुबेर इनामदार :-**

सर्वेक्षणाची निधी उपलब्ध होणार त्याची वेळ सिमा निश्चित झालेली आहे का? कधीपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करुन द्यायचं आहे.

**दिपाली पोवार :-**

आपण करारनामा दिल्यानंतर ३ महिन्याच्या आत त्यांना सर्वेक्षण पूर्ण करुन द्यायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

करारनामा हा विषय बरोबर आहे. शासनाची वेळ मर्यादा ठरली आहे का? इतक्या काळामध्ये निविदा प्रक्रिया संपवुन केले पाहीजे. कधीपर्यंत.

**दिपाली पोवार :-**

निविदा प्रक्रिया झाली ते आम्ही त्यांना कळवले आहे. त्यांनी पत्र पाठवले की ३ महिन्याच्या आत सर्वेक्षण कम्पलीट करायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

आज हा विषय मान्य केला नाही पुढच्या समितीमध्ये परत ठेवणार त्याला निधी लॅब्स पिरेड आहे का?

**दिपाली पोवार :-**

स्टॅडींग मंजुरी घेऊन हा प्रस्ताव डी.एम.ए. ला पाठवणार आणि मग आपल्याला निधी येणार.

**जुबेर इनामदार :-**

व्हॉट इज डी.एम.ए.

**दिपाली पोवार :-**

डायरेक्टर म्युन्सिपल ॲडमिनीस्ट्रेशन.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये जी एजन्सी आहे ते काय काय करणार आहेत, त्याची माहिती द्या.

**दिपाली पोवार :-**

एजन्सी स्पॉट वर जाऊन सर्वक्षण करेल. सर्वेक्षण फॉम डी.एम.ए. नी मंजुर केलेले आहे. फॉम अंतर्गत त्यांना सर्वेक्षण करुन घ्यायचे आहे. त्याच्यानंतर सर्वेक्षणचा रहिवासी दाखला, रेसिडेन्शियल पुरावे आणि आधारकार्ड घ्यायचे आहे. आणि सर्वेक्षण झाल्यानंतर त्याला हॉकर्सचा आयडी कार्ड आणि सर्टीफिकेट इश्यु करणार त्या आयडीकार्डवर आऊटवर्ड नंबर, रजिस्ट्रेशन नंबर, हॉकर्स आयडी, हॉकर्स पर्सनल डिटेल्स अशाप्रकारे त्याचे कार्ड असेल. आणि त्याच्यावर आपण जी बाजार फी निश्चित केलेली आहे. हा विषय महासभेत येईलच. सर्वेक्षण केल्यानंतर यादी प्रसिद्ध करायची आहे. त्यानंतर हरकती सुचना मागवून झाल्यानंतर यादी मंजुर करुन त्यांना आयकार्ड इश्यु करायचे.

**दिप्ती भट :-**

ते लोक मिरा भाईंदरचे असायला पाहिजे.

**दिपाली पोवार :-**

आपण ठरवले आहे की मिरा भाईंदरमध्ये ज्यांचे वास्तव्य आहे त्यांनाच देणार.

**अनिता पाटील :-**

वास्तव्याचे काही ठेवले आहे का?

**दिपाली पोवार :-**

वास्तव्याचा १५ वर्षाचा दाखला लागेल.

**राजीव मेहरा :-**

मॅडम सब फेरीवाले को देंगे।

**दिपाली पोवार :-**

जो पात्र है उनको ही देंगे।

**राजीव मेहरा :-**

कौन होगा पात्र?

**दिपाली पोवार :-**

जो १५ साल से रहिवासी है।

**राजीव मेहरा :-**

१५ साल से रहिवासी है। पर उसने ३ महिना पहले लगाया है तो।

**दिपाली पोवार :-**

उसका नही निकलेगा।

**राजीव मेहरा :-**

जैसे स्लम के लिए ९० तक क्लिअर हुँआ उसके बाद डिमॉलिश कर देते है। कुछ डेड लाईन रहेगी। ६ महिने में बहुत बढ गये तो सबको दे देंगे।

**दिपाली पोवार :-**

सर्व्हे तो सबका होगा।

**राजीव मेहरा :-**

सर्व्हे नही आपने बोला सबको आयडेन्टी कार्ड देंगे।

**दिपाली पोवार :-**

जिनका डॉक्युमेंट क्लिअर है, उनको ही कार्ड देंगे।

**राजीव मेहरा :-**

मतलब क्रायटेरीया क्या रहेगा। १० साल पहले थे उनका देंगे।

**दिपाली पोवार :-**

१५ सालसे रहिवासी दाखला है।

**राजीव मेहरा :-**

मॅडम में २० सालसे रहता हूँ। ३ महिने पहले मैने गाडी लगाई है। तो मेरे को मिलेगा की नही मिलेगा। अभी जिधर नही थे। ३ महिने पहले जहॉ रोड क्लीन थी वहॉ अभी खडे रहने के लिए जगी नही है।

**मा. सभापती :-**

वह डिसीजन हम लोंगो को लेना है। स्थायी समिती डिसीजन देंगी। इन का काम सर्व्हे करने का है।

**राजीव मेहरा :-**

सर्व्हे फॉर्म में क्या है।

**मा. सभापती :-**

इसलिए हमने इसको पोस्टपॉन्ड किया है।

**राजीव मेहरा :-**

इन्स्ट्रक्शन रहेगी किसको क्या करना है।

**मा. सभापती :-**

मॅडम उस में फोटोग्राफ्स वगैरा।

**दिपाली पोवार :-**

पंधरा वर्षाचा रहिवासी दाखला आणि आधार कार्ड.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ह्याला ग्रॅव्हीटी विचार केली तर ही प्रसिध्दी झाल्यानंतर जो कधीच लावत नव्हता आणि त्याचे पंधरा वर्षाचे वास्तव्य असेल तो ही सभापती साहेब तिकडे येऊन उभा राहील. आणि सर्वेक्षणात तो पात्र ठरेल. हा विषय असा होणार. त्याला अंकुश कसा लावणार त्याचा काय नियोजन करणार.

**दिप्ती भट :-**

२००८-१० मध्ये हा सर्व्हे झालेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

ज्यांची सर्वेक्षणामध्ये नाव येतील जो शहराचा पंधरा वर्षापासून रहिवासी आहे पण तो कधी फेरीवाला नव्हता तो नविन फेरीवाला झाला.

**दिपाली पोवार :-**

त्यासाठी आपण हरकती मागवायला यादी प्रसिध्द करणार.

**दिप्ती भट :-**

त्याच्यात तुम्ही पावती नंबर बघणार.

**दिपाली पोवार :-**

आपल्याला पावतीच दिली नाही.

**दिप्ती भट :-**

ठेक्यावर देतात ते.

**दिपाली पोवार :-**

त्याच्याकडे पावती असेल तर पावती घेऊ.

**जुबेर इनामदार :-**

साहेब असे काय तरी आपल्याला करायला लागेल.

**मा. सभापती :-**

ह्याच्यामध्ये आपण एक मिटींग घेऊ. संबंधित एजन्सी आहे त्यांना बोलवू. संबंधीत अधिकारी, गटनेत्याची महापौर दालनात मिटींग घेऊन ह्याच्यावर धोरण निश्चित करू.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ज्या कामासाठी आपण सुरूवात केली ह्याला कुठेतरी अंकूश लावून कमी करायचे आहेत. ते कमी होणार नाहीत वाढतील.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १२५ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका शहर फेरीवाला सर्व्हेक्षण बाबतची निविदा मा . स्थायी समितीसमोर ठेवणेबाबत.**

**ठराव क्र. १०३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्याचे सर्वेक्षण करणे कामी ऑनलाईन ई-टेंडरींद्वारे तसेच “मुंबई ल्खदीप” तसेच “सर्वश्रेष्ठ राजसत्ता” या वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा दि. ७-०९-२०१८ ते १८-०९-२०१८ पयंत मागविण्यात आल्या होत्या. सदर मुदतीत एकूण ०२ निविदा प्राप्त झाल्या असल्यामुळे सदर निविदेस दि. २७-०९-२०१८ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली. सदर मुदतवाढीमध्ये बीड कंउंटपेज वरून एकूण ०५ निविदा प्राप्त झाल्याचे दिसुन येत आहे. सदर निविदाधारकांनी निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे सादर केली असुन सदर निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड उघडले असता त्यांनी खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

| अ. क्र. | तपशील | साय आय टी रिसोर्स लि. | मार्क इंटरप्रायजेस | अर्थव प्लानिंग ॲन्ड रिर्सच प्रा.लि. | ऑल इंडिया इंन्स्टिटयूट ऑफ लोक सेल्फ गर्व. | मॅगोज इंटप्रायजेस | मॅगोज इंटप्रायजेस यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेल दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सादर केलेले | १५३/- | १४९.५०/- | १७५.५२/- | २७६/- | ११८/- | ११४/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | दर | | | | | | |

वरील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे मॅगोज इंटरप्रायजेस यांनी सर्वात कमी दर सादर केलेले आहेत. सदर दरामध्ये वाटाघाटी केली असता मॅगोज इंटप्रायजेस यांनी खालील प्रमाणे दर मान्य केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशील | मॅगोज इंटप्रायजेस | मॅगोज इंटप्रायजेस यांनी वाटाघाती अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | सादर केलेले दर | ११८/- | ११४/- |

वरील तक्त्यात नमूद दर पाहता मॅगोज इंटप्रायजेस यांनी सादर केलेले दर इतर निविदाधारकांनी सादर केलेल्या दरापेक्षा कमी आहेत. तसेच दि.अं.यो.रा.ना.उ.अ./च्छच्ज/का-१६/२०१८-१९/२१५७ दि. १५-०६-२०१८ रोजी नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी प्रती विक्रेता रू. १५०/- खर्चाची मर्यादा निश्चित करून दिली आहे. तसेच सदर सर्वेक्षण कामी निधी नगर परिषद प्रशासन संचालनालय यांचेकडून प्राप्त होणार आहे. तरी मार्क इंटरप्रायजेस यांनी सादर केलेल्या दराबाबत तुलना केली असता सदरचे दर वाजवी आहेत. तरी कमी दराच्या निविदा मा. स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्र.**

सदरचा विषयबाबत सन्माननीय सदस्यांच्या सुचना व तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची अहवाल तसेच संपूर्ण माहितीसह फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. निला सोंस अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२६, **महापालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामाच्या निविदेस मंजूरी देणेबाबत**

**राकेश शाह :-**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामी दि. १७/०७/२०१८ रोजी दैनिक तरुण भारत, दैनिक खबरे आजतक या वृत्तपत्रात तसेच Online E- Tendering द्वारे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता सदर कालावधीमधे एकूण ७ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1) Ganeshkrupa Infra PVT LTD 2) Sainik Intelligenece Security Private Limited 3) Sitaram Travels 4) GENIUS INFOTECH 5) K R SONAVANE AND SONS 6) Sarwasva Entrepreneurs 7) Radford Global Limited वरील निविदेची कागदपत्रे छाननी केली असता दि. २४/०९/२०१८ रोजी झालेल्या निविदा निवड समिती बैठकीनुसार 1) Ganeshkrupa Infra PVT LTD 2) Sainik Intelligenece Security Private Limited 4) GENIUS INFOTECH 5) K R SONAVANE AND SONS 6) Sarwasva Entrepreneurs 7) Radford Global Limited या निविदा पात्र ठरविण्यात आल्या असून 3) Sitaram Travels यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली असून पात्र निविदा धारकांच्या निविदा उघडल्या असता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| | | Ganeshkrupa Infra PVT LTD | | | Sainik Intelligenece Security Private Limited | | | GENIUS INFOTECH | | | K R SONAVANE AND SONS | | | Sarwasva Entrepreneurs | | | Radford Global Limited | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त कामाचे दर) | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त कामाचे दर) | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त कामाचे दर) | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त कामाचे दर) | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त कामाचे दर) | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर करासह) | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त कामाचे दर) |
| १ | मोठे टेम्पो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| २ | लहान टेम्पो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ३ | सक्शन पंप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ४ | जेटींग पंप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ५ | रुग्णवाहीका | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ६ | फिरता दवाखाना | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ७ | मेडिकल व्हॅन | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | व्हॅक्सिन व्हॅन | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ९ | शववाहिनी | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १० | जीप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ११ | महिंद्रा पिकअप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १२ | अग्नीशमन बंब | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ८७९ | १९८४२ | ५२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १३ | वॉटर टेंडर | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ८७९ | १९८४२ | ५२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १४ | कार | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १५ | हायड्रोलीक शिडी | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | १०२२ | २६५७२ | ३९० | ८७९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १६ | ट्रॅक्टर | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १७ | टँकर | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ८७९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १८ | ट्रक | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | १०२२ | २६५७२ | ३९० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १९ | ॲपे पियागो टेम्पो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| २० | महिंद्रा मॅक्सिमो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता १ ते २० वाहनांकरिता Sarwasva Entrepreneurs यांचे दर सर्वात कमी आहेत. तथापी किमान वेतन अधिनियम रु. १९४८ व वेतन नियम १९६३ नुसार संबंधित वाहनचालकांना किमान वेतन दर (झोन-२) प्रमाणे **ड** वर्ग महानगरपालिकेचे इंडस्ट्रीज एनर्जी अन्ड लेबर डिपार्टमेंट मुंबई यांचे दि.२४/२/२०१५ चे राजपत्र व मे.वेदांत इंटरप्राईजेस कन्सल्टंट यांनी सादर केलेल्या दरपत्रक झोन २ (दि.१/७/२०१८ ते दि.३१/१२/२०१८) प्रमाणे मुळवेतन पी.एफ.महागाई भत्ता,एच.आर.ए.इएसआयसी,बोनस इ.सहित रु.२१४७७/-इतके किमान वेतन देणे आवश्यक आहे. तथापी निविदा निवड समिती दि. २५/०९/२०१८ रोजी निवड निविदा समिती सभेत झालेल्या चर्चेनुसार मा. उप-कामगार आयुक्त ठाणे व मा.कामगार आयुक्त बांद्रा यांच्याकडून किमान वेतनाबाबत अभिप्राय मागविले असता, त्याचेकडील पत्र क्र. काउआ/ठाणे/कि.वे.अ./२०१८/८०१८ दि. ३०/१०/२०१८ अन्वये दि. २४/०२/२०१५ व दि. २०/०७/२०१० अन्वये योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. दि. २४/०२/२०१५ मधील अधिसूचनेनुसार मूळ वेतन व दर सहा महिन्याने जाहिर होणारा महागाई भत्ता तसेच अधिसूचनेतील ए व जी नुसार महापालिका क्षेत्र तसेच किमान वेतन दरामध्ये मूळ दर, विशेष भत्ता आणि इतर सवलती अशा सर्व दरांचा समावेश असलेबाबत नमूद करण्यात आले आहे. सदर अधिसुचनेनुसार Sarwasva Entrepreneurs यांनी सादर केलेले दर हे किमान वेतनापेक्षा कमी असल्याचे दिसून येत असल्याने त्यांना इकडील पत्र क्र. मनपा/वाहन/२११/२०१८-१९ दि. २३/१०/२०१८ अन्वये किमान वेतनानुसार कशाप्रकारे वेतन अदा करणार याबाबत कळविले असता त्यांनी दि. २६/१०/२०१८ अन्वये किमान वेतनानुसार रु. २१,६७७/- (P.F. वगळून) व रु. २३,४७७/- (P.F. सहित) काम करणेस तयार असलेबाबत लेखी पत्राव्दारे सहमती दर्शविलेली आहे. तसेच बोनस व इनकॅशमेंट (सुट्टीचा पगार) ते अदा करणार असलेबाबत दि. २६/१०/२०१८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे. व दि. १४/११/२०१८ रोजी त्यांनी स्विकृतीपत्र

दिल्सानंतर रु. ९ लक्ष सुरक्षा अनामत बॅक गॅरेंटी स्वरुपात देण्यास तयार आहेत. तसेच सुरक्षा अनामत पोटी प्रत्येक महिन्याचे सुरक्षा ठेव म्हणून २% इतकी रक्कम जमा करणार असलेबाबत कळविले आहे. निविदेतील अटीशर्तीनुसार बँक गॅरेंटी जमा करणे तसेच कामाचा अनुभव याबाबत इकडील पत्र क्र. जा.क्र./मनपा/वाहन/२२१/२०१८-१९ दि. ०३/११/२०१८ अन्वये मे. सर्वस्व इंटरप्रायजेस यांना कळविले असता त्यांनी दि. ०६/११/२०१८ रोजी निविदेतील नियमानुसार होणा-या रक्कमेची बँक गॅरेंटी देण्यास तसेच कामाच्या अनुभवाचा दाखला सादर केलेला आहे. तरी सोबत जोडलेल्या विधी विभागाचे अभिप्रायानुसार मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांनी दिलेल्या वरील पत्रानुसार त्यांनी निविदेत सादर केलेले दर रु. १९,८४२/- महापालिकेमार्फत अदा करणेस व मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स संबंधित वाहनचालक यांना किमान वेतनाप्रमाणे देयक अदा करणार असलेबाबत दि. २६/१०/२०१८ अन्वये कळविले आहे. तसेच मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स हे किमान वेतनाप्रमाणे देयक अदा केल्याबाबत विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात येईल, तरी मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स कमी दराची निविदा स्विकारावी तसेच ठेक्याची मुदत १२ महिने किंवा रु.१ कोटी पर्यंतची तरतूदीस, ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १२६ :-**

**महापालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामाच्या निविदेस मंजूरी देणेबाबत**

**ठराव क्र. १०४ :-**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणेकामी दि. १७/०७/२०१८ रोजी दैनिक तरुण भारत, दैनिक खबरे आजतक या वृत्तपत्रात तसेच Online E- Tendering द्वारे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली असता सदर कालावधीमधे एकूण ७ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1) Ganeshkrupa Infra PVT LTD 2) Sainik Intelligenece Security Private Limited 3) Sitaram Travels 4) GENIUS INFOTECH 5) K R SONAVANE AND SONS 6) Sarwasva Entrepreneurs 7) Radford Global Limited वरील निविदेची कागदपत्रे छाननी केली असता दि. २४/०९/२०१८ रोजी झालेल्या निविदा निवड समिती बैठकीनुसार 1) Ganeshkrupa Infra PVT LTD 2) Sainik Intelligenece Security Private Limited 4) GENIUS INFOTECH 5) K R SONAVANE AND SONS 6) Sarwasva Entrepreneurs 7) Radford Global Limited या निविदा पात्र ठरविण्यात आल्या असून 3) Sitaram Travels यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली असून पात्र निविदा धारकांच्या निविदा उघडल्या असता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| | | Ganeshkrupa Infra PVT LTD | | | Sainik Intelligenece Security Private Limited | | | GENIUS INFOTECH | | | K R SONAVANE AND SONS | | | Sarwasva Entrepreneurs | | | Radford Global Limited | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त | प्रतिदिन प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रतिमाहिना प्रति वाहनचालक दर (सर्व दर | प्रति आठ तासानंतर (प्रति तीन तास अतिरिक्त |

| | | करासह) | करासह) | कामाचे दर) | करासह) | करासह) | कामाचे दर) | करासह) | करासह) | कामाचे दर) | करासह) | करासह) | कामाचे दर) | करासह) | करासह) | कामाचे दर) | करासह) | करासह) | कामाचे दर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोठे टेम्पो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| २ | लहान टेम्पो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ३ | सक्शन पंप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ४ | जेटींग पंप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ५ | रुग्णवाहीका | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ६ | फिरता दवाखाना | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ७ | मेडिकल व्हॅन | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ८ | व्हॅक्सिन व्हॅन | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ९ | शववाहिनी | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १० | जीप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| ११ | महिंद्रा पिकअप | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १२ | अग्नीशमन बंब | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ८७९ | १९८४२ | ५२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १३ | वॉटर टेंडर | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ८७९ | १९८४२ | ५२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १४ | कार | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १५ | हायड्रोलीक शिडी | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | १०२२ | २६५७२ | ३९० | ८७९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १६ | ट्रॅक्टर | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १७ | टँकर | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ८७९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १८ | ट्रक | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | १०२२ | २६५७२ | ३९० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| १९ | ॲपे पियागो टेम्पो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |
| २० | महिंद्रा मॅक्सिमो | १३०० | ३१,५०० | ५०० | १०६७ | ३२०१० | ७५० | ९४२ | २३४११ | ३५० | ९७८ | २५४२८ | ३७० | ६८९ | १९८४२ | ४२१ | ९७० | २५२२० | ७२८ |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता १ ते २० वाहनांकरिता Sarwasva Entrepreneurs यांचे दर सर्वात कमी आहेत. तथापी किमान वेतन अधिनियम रु. १९४८ व वेतन नियम १९६३ नुसार संबंधित वाहनचालकांना किमान वेतन दर (झोन-२) प्रमाणे **ड** वर्ग महानगरपालिकेचे इंडस्ट्रीज एनर्जी अन्ड लेबर डिपार्टमेंट मुंबई यांचे दि.२४/२/२०१५ चे राजपत्र व मे.वेदांत इंटरप्राईजेस कन्सल्टंट यांनी सादर केलेल्या दरपत्रक झोन २ (दि.१/७/२०१८ ते दि.३१/१२/२०१८) प्रमाणे मुळवेतन पी.एफ.महागाई भत्ता,एच.आर.ए.इएसआयसी,बोनस इ.सहित रु.२१४७७/-इतके किमान वेतन देणे आवश्यक आहे. तथापी निविदा निवड समिती दि. २५/०९/२०१८ रोजी निवड निविदा समिती सभेत झालेल्या चर्चेनुसार मा. उप-कामगार आयुक्त ठाणे व मा.कामगार आयुक्त बांद्रा यांच्याकडून किमान वेतनाबाबत अभिप्राय मागविले असता, त्याचेकडील पत्र क्र. काउआ/ठाणे/कि.वे.अ./२०१८/८०१८ दि. ३०/१०/२०१८ अन्वये दि. २४/०२/२०१५ व दि. २०/०७/२०१० अन्वये योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. दि. २४/०२/२०१५ मधील अधिसूचनेनुसार मूळ वेतन व दर सहा महिन्याने जाहिर होणारा महागाई भत्ता तसेच अधिसूचनेतील ए व जी नुसार महापालिका क्षेत्र तसेच किमान वेतन दरामध्ये मूळ दर, विशेष भत्ता आणि इतर सवलती अशा सर्व दरांचा समावेश असलेबाबत नमूद करण्यात आले आहे. सदर अधिसुचनेनुसार Sarwasva Entrepreneurs यांनी सादर केलेले दर हे किमान वेतनापेक्षा कमी असल्याचे दिसून येत असल्याने त्यांना इकडील पत्र क्र. मनपा/वाहन/२११/२०१८-१९ दि. २३/१०/२०१८ अन्वये किमान वेतनानुसार कशाप्रकारे वेतन अदा करणार याबाबत कळविले असता त्यांनी दि. २६/१०/२०१८ अन्वये किमान वेतनानुसार रु. २१,६७७/- (P.F. वगळून) व रु. २३,४७७/- (P.F. सहित) काम करणेस तयार असलेबाबत लेखी पत्राव्दारे सहमती दर्शविलेली आहे. तसेच बोनस व इनकॅशमेंट (सुट्टीचा पगार) ते अदा करणार असलेबाबत दि. २६/१०/२०१८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे. व दि. १४/११/२०१८ रोजी त्यांनी स्विकृतीपत्र दिल्सानंतर रु. ९ लक्ष सुरक्षा अनामत बॅक गॅरेंटी स्वरुपात देण्यास तयार आहेत. तसेच सुरक्षा अनामत पोटी प्रत्येक महिन्याचे सुरक्षा ठेव म्हणून २% इतकी रक्कम जमा करणार असलेबाबत कळविले आहे. निविदेतील अटीशर्तीनुसार बँक गॅरेंटी जमा करणे तसेच कामाचा अनुभव याबाबत इकडील पत्र क्र. जा.क्र./मनपा/वाहन/२२१/२०१८-१९ दि. ०३/११/२०१८ अन्वये मे. सर्वस्व इंटरप्रायजेस यांना कळविले असता त्यांनी दि. ०६/११/२०१८ रोजी निविदेतील नियमानुसार होणा-या रक्कमेची बँक गॅरेंटी देण्यास तसेच कामाच्या अनुभवाचा दाखला सादर केलेला आहे. तरी सोबत जोडलेल्या विधी विभागाचे अभिप्रायानुसार मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांनी दिलेल्या वरील पत्रानुसार त्यांनी निविदेत सादर केलेले दर रु. १९,८४२/- महापालिकेमार्फत अदा करणेस व मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स संबंधित वाहनचालक यांना किमान वेतनाप्रमाणे देयक अदा करणार असलेबाबत दि. २६/१०/२०१८ अन्वये कळविले आहे. तसेच मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स हे किमान वेतनाप्रमाणे देयक अदा केल्याबाबत विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात येईल, तरी मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स कमी दराची निविदा स्विकारावी तसेच ठेक्याची मुदत १२ महिने किंवा रु.१ कोटी पर्यंतची तरतूदीस, ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२७, **निविदेस मान्यता देणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**राकेश शाह :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **रिलायन्स पॉवर हाऊस पासून पुढे एम.एम.आर.डी.ए. मार्फत प्रस्तावित वेस्टर्न हॉटेल ते नवघर विकास आराखडयातील रस्त्यातून १३५० मि.मी. व्यासाची ८०० मिटर लांबीची मृदूपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.**

**(अंदाजित रक्कम** रु. ४,०२,१८,११६/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| मे. देव इंजिनिअर्स | **अंदाजपत्रक दरापेक्षा १८.००% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दराने** |

निविदा सुचना क्र.१० (२०१८-१९) दि.१९/०५/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता दोन वेळा मुदतवाढ प्रसिद्धीअंती दि.०२/०७/२०१८ पर्यत एक ही निविदा मुदतीत प्राप्त झालेली नव्हती. सदर निविदेस प्रतिसाद मिळाला नसल्याने फेर-निविदा काढण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने फेर-निविदा सुचना क्र.१८ (२०१८-१९) दि.०३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता दोन वेळा मुदतवाढ प्रसिद्धीअंती दि.०६/०८/२०१८ पर्यत एक निविदा मुदतीत प्राप्त झालेली असुन वरीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत. सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.४,२९,५८,१९१/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ६.८१% जास्त होत आहे.

ठेकेदाराकडून जादाच्या दराबाबत प्राप्त स्पष्टीकरण पाहता उपरोक्त बाबी व्यतिरिक्त ठेकेदाराने निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क, पाईपचा साठा करण्याच्या जागेचे भाडे, पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबाबींचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. ४,६८,६३,८१३/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.५२% जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा सुधारीत देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.९८ % जास्त दराचा आहे.

सदर कामाच्या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. च्या निधीतून कॉक्रीट रस्ता बनविण्यासाठीच्या निविदा मंजूर झालेल्या आहेत. मात्र सदरच्या प्रस्तावीत कॉक्रीट रस्त्याच्या कामापूर्वी त्याठिकाणी विषयांकीत जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. तसेच याकामासाठी यापूर्वी मुळनिविदेस दोन वेळा मुदतवाढ देऊन प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा काढून फेरनिविदेस दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर फक्त एकच निविदा प्राप्त झालेली आहे. प्राप्त परिस्थितीचे अवलोकन तसेच कामाची निकड पाहता ठेकेदाराने दिलेले स्पष्टीकरण योग्य वाटत असल्याने ते मान्य करुन ठेकेदारास दराबाबतच्या वाटाघाटी करण्यात आलेली आहे. सदर वाटाघाटीअंती ठेकेदाराने अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दरात काम करण्यास सर्मथता दर्शवली आहे. निविदेची मुळ किंमत ४,०२,१८,११६/- इतकी आहे व वाटाघाटीअंती १७.५० % जास्त दराने याप्रमाणे रु.४,७२,५६,२८६/- इतकी आहे. चालू दरसुची तसेच ठेकेदाराने जादा दराबाबत दिलेले स्पष्टीकरणाशी मुल्यांकीत केल्यास दर वाटाघाटीअंती ०.९८ % जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदर कामाकरीता “नविन जलवाहिनी टाकणे” या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. मा. विशेष महासभा दि.२०/०२/२०१८ ठराव क्र.६९ अन्वये सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर काम हे महानगरपालिकेच्या डी.पी.रोड वर होणार आहे.

**२) भाईंदर (प.) भाईंदर उत्तन रोडवरील सुभाषचंद्र बोस जलकुंभ ते डोंगरी पंपिंग स्टेशन पर्यंत मुख्य (फिडरमेन) ६०० मि.मी. व्यासाची मृदू पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.**

**(अंदाजित रक्कम रु.** ७,४९,६०,१२४/-)

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **मे. देव इंजिनिअर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २०.००% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दराने** |

निविदा सुचना क्र.०२ (२०१८-१९) दि.१०/०४/२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता एक वेळा मुदतवाढ प्रसिद्धीअंती दि.१६/०५/२०१८ पर्यत तीन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या होत्या. सदर निविदेतील एक निविदाधारकाने निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र ठरले होते व दोन निविदाधारकाने निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरले होते. त्यामुळे सदर निविदेस पुरेशी स्पर्धा झालेली नसल्यामुळे मा. निविदा निवड समितीने दि.२१/०७/२०१८ रोजी सदर निविदेस फेर-निविदा करण्यास शिफारस केलेली आहे.

त्या अनुषंगाने फेर-निविदा सुचना क्र.१९ (२०१८-१९) दि.२४/०७/२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता प्रसिद्धीअंती दि.१३/०८/२०१८ पर्यत एक निविदा मुदतीत प्राप्त झालेली असुन वरीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत. सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.७,९८,६१,६१९/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ६.५४% जास्त होत आहे.

ठेकेदाराकडून जादाच्या दराबाबत प्राप्त स्पष्टीकरण पाहता उपरोक्त बाबी व्यतिरिक्त ठेकेदाराने निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क, पाईपचा साठा करण्याच्या जागेचे भाडे, पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबाबींचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. ८,७५,९८,५१६/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.८६ % जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा सुधारीत देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.६४% जास्त दराचा आहे.

सदर कामाच्या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. च्या निधीतून कॉक्रीट रस्ता बनविण्यासाठीच्या निविदा मंजूर झालेल्या आहेत. मात्र सदरच्या प्रस्तावीत कॉक्रीट रस्त्याच्या कामापूर्वी त्याठिकाणी विषयांकीत जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. तसेच याकामासाठी यापूर्वी मुळनिविदेस एक वेळा मुदतवाढ देऊन पुरेशी स्पर्धा न झाल्यामुळे फेरनिविदा काढून फक्त एकच निविदा प्राप्त झालेली आहे. प्राप्त परिस्थितीचे अवलोकन तसेच कामाची निकड पाहता ठेकेदाराने दिलेले स्पष्टीकरण योग्य वाटत असल्याने ते मान्य करुन ठेकेदारास दराबाबतच्या वाटाघाटी करण्यात आलेली आहे. सदर वाटाघाटीअंती ठेकेदाराने अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दरात काम करण्यास सर्मथता दर्शवली आहे. निविदेची मुळ किंमत ७,४९,६०,१२४/- इतकी आहे व वाटाघाटीअंती १७.५० % जास्त दराने याप्रमाणे रु.८,८०,७८,१४६/- इतकी आहे. चालू दरसुची तसेच ठेकेदाराने जादा दराबाबत दिलेले स्पष्टीकरणाशी मुल्यांकीत केल्यास दर वाटाघाटीअंती ०.६४ % जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदर कामाकरीता "नविन जलवाहिनी टाकणे" या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. मा. विशेष महासभा दि.२०/०२/२०१८ ठराव क्र.६९ अन्वये सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर काम हे महानगरपालिकेच्या डी.पी.रोड वर होणार आहे.

**३) मिरारोड (पुर्व) एस.के.स्टोन सिग्नल ते शांती नगर सेक्टर-११ ऊंच जलकुंभापर्यंत मृदू पोलादी फिडरमेन जलवाहिनी टाकणे.**
**(अंदाजित रक्कम रू. १,८०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा १७.१०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १७.००% जास्त दराने** |
| मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २०.००% जास्त दराने |

निविदा सुचना क्र.१०/०२ (२०१८-१९) दि.१९/०५/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता दोन वेळा मुदतवाढ प्रसिध्दीअंती दि.०२/०७/२०१८ पर्यत एक निविदा मुदतीत प्राप्त झालेली होती. सदर निविदेस कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे फेर-निविदा सुचना क्र.१८/०६ (२०१८-१९) दि.०३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेस देखील कमी प्रतिसाद मिळालेला आहे.

त्या अनुषंगाने फेर-निविदा सुचना क्र.१९/०२ (२०१८-१९) दि.२४/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता प्रसिध्दीअंती दि.१३/०८/२०१८ पर्यत दोन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या असुन वरीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत. सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.१,९३,७८,२४४/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ७.६६% जास्त होत आहे.

ठेकेदाराकडून जादाच्या दराबाबत प्राप्त स्पष्टीकरण पाहता उपरोक्त बाबी व्यतिरिक्त ठेकेदाराने निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क , पाईपचा साठा करण्याच्या जागेचे भाडे, पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबाबींचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. २,०९,९०,७१५/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.६१% जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा सुधारीत देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.३९ % जास्त दराचा आहे.

सदर कामासाठी यापूर्वी मुळनिविदेस दोन वेळा मुदतवाढ देऊन प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा काढून फेरनिविदेस दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त परिस्थितीचे अवलोकन तसेच कामाची निकड पाहता ठेकेदाराने दिलेले स्पष्टीकरण योग्य वाटत असल्याने ते मान्य करुन ठेकेदारास दराबाबतच्या वाटाघाटी करण्यात आलेली आहे. सदर वाटाघाटीअंती ठेकेदाराने अंदाजपत्रक दरापेक्षा १७.००% जास्त दरात काम करण्यास सर्मथता दर्शवली आहे. निविदेची मुळ किंमत १,८०,००,०००/- इतकी आहे व वाटाघाटीअंती १७.०० % जास्त दराने याप्रमाणे रु.२,१०,६०,०००/- इतकी आहे. चालू दरसुची तसेच ठेकेदाराने जादा दराबाबत दिलेले स्पष्टीकरणाशी मुल्यांकीत केल्यास दर वाटाघाटीअंती ०.३९% जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदर कामाकरीता “नविन जलवाहिनी टाकणे” या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. मा. महासभा दि.२८/०३/२०१८ ठराव क्र.१०३ अन्वये सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर काम हे महानगरपालिकेच्या डी.पी.रोड वर होणार आहे.

उपरोक्त अ.क्र. १ ते ३ या कामाकरीता निविदाधारकाने सादर केलेले दरास मा. निविदा निवड समितीने शिफारस केलेली आहे. तसेच मा.आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व २ च्या कामांकरीता मे. देव इंजिनिअर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दर व अ.क्र. ३ च्या कामांकरीता मे. विंध्या ट्रेडर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १७.००% जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. १२७ :-**

**निविदेस मान्यता देणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**ठराव क्र. १०५ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

२) **रिलायन्स पॉवर हाऊस पासून पुढे एम.एम.आर.डी.ए. मार्फत प्रस्तावित वेस्टर्न हॉटेल ते नवघर विकास आराखडयातील रस्त्यातून १३५० मि.मी. व्यासाची ८०० मिटर लांबीची मृदूपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.**

**(अंदाजित रक्कम रु. ४,०२,१८,११६/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| मे. देव इंजिनिअर्स | **अंदाजपत्रक दरापेक्षा १८.००% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दराने** |

निविदा सुचना क्र.१० (२०१८-१९) दि.१९/०५/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता दोन वेळा मुदतवाढ प्रसिध्दीअंती दि.०२/०७/२०१८ पर्यत एक ही निविदा मुदतीत प्राप्त झालेली नव्हती. सदर निविदेस प्रतिसाद मिळाला नसल्याने फेर-निविदा काढण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने फेर-निविदा सुचना क्र.१८ (२०१८-१९) दि.०३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता दोन वेळा मुदतवाढ प्रसिध्दीअंती दि.०६/०८/२०१८ पर्यत एक निविदा मुदतीत प्राप्त झालेली असुन वरीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत. सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.४,२९,५८,१९१/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ६.८१% जास्त होत आहे.

ठेकेदाराकडून जादाच्या दराबाबत प्राप्त स्पष्टीकरण पाहता उपरोक्त बाबी व्यतिरिक्त ठेकेदाराने निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क, पाईपचा साठा करण्याच्या जागेचे भाडे, पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबार्बीचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. ४,६८,६३,८१३/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.५२% जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा सुधारीत देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.९८ % जास्त दराचा आहे.

सदर कामाच्या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. च्या निधीतून कॉक्रीट रस्ता बनविण्यासाठीच्या निविदा मंजूर झालेल्या आहेत. मात्र सदरच्या प्रस्तावीत कॉक्रीट रस्त्याच्या कामापूर्वी त्याठिकाणी विषयांकीत जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. तसेच याकामासाठी यापूर्वी मुळनिविदेस दोन वेळा मुदतवाढ देऊन प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा काढून फेरनिविदेस दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर फक्त एकच निविदा प्राप्त झालेली आहे. प्राप्त परिस्थितीचे अवलोकन तसेच कामाची निकड पाहता ठेकेदाराने दिलेले स्पष्टीकरण योग्य वाटत असल्याने ते मान्य करुन ठेकेदारास दराबाबतच्या वाटाघाटी करण्यात आलेली आहे. सदर वाटाघाटीअंती ठेकेदाराने अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दरात काम करण्यास सर्मथता दर्शवली आहे. निविदेची मुळ किंमत ४,०२,१८,११६/- इतकी आहे व वाटाघाटीअंती १७.५० % जास्त दराने याप्रमाणे रु.४,७२,५६,२८६/- इतकी आहे. चालू दरसुची तसेच ठेकेदाराने जादा दराबाबत दिलेले स्पष्टीकरणाशी मुल्यांकीत केल्यास दर वाटाघाटीअंती ०.९८ % जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदर कामाकरीता “नविन जलवाहिनी टाकणे” या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. मा. विशेष महासभा दि.२०/०२/२०१८ ठराव क्र.६९ अन्वये सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर काम हे महानगरपालिकेच्या डी.पी.रोड वर होणार आहे.

**२) भाईदर (प.) भाईदर उत्तन रोडवरील सुभाषचंद्र बोस जलकुंभ ते डोंगरी पंपिंग स्टेशन पर्यंत मुख्य (फिडरमेन) ६०० मि.मी. व्यासाची मृदू पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.**
**(अंदाजित रक्कम रू. ७,४९,६०,१२४/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| मे. देव इंजिनिअर्स | **अंदाजपत्रक दरापेक्षा २०.००% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दराने** |

निविदा सुचना क्र.०२ (२०१८-१९) दि.१०/०४/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता एक वेळा मुदतवाढ प्रसिध्दीअंती दि.१६/०५/२०१८ पर्यत तीन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या होत्या. सदर निविदेतील एक निविदाधारकाने निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर केलेली असल्याने ते पात्र ठरले होते व दोन निविदाधारकाने निविदेतील अटीशर्ती नुसार कागदपत्रे सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरले होते. त्यामुळे सदर निविदेस पुरेशी स्पर्धा झालेली नसल्यामुळे मा. निविदा निवड समितीने दि.२१/०७/२०१८ रोजी सदर निविदेस फेर-निविदा करण्यास शिफारस केलेली आहे.

त्या अनुषंगाने फेर-निविदा सुचना क्र.१९ (२०१८-१९) दि.२४/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता प्रसिध्दीअंती दि.१३/०८/२०१८ पर्यत एक निविदा मुदतीत प्राप्त झालेली असुन वरीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत. सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.७,९८,६१,६१९/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ६.५४% जास्त होत आहे.

ठेकेदाराकडून जादाच्या दराबाबत प्राप्त स्पष्टीकरण पाहता उपरोक्त बाबी व्यतिरिक्त ठेकेदाराने निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क, पाईपचा साठा करण्याच्या जागेचे भाडे, पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबाबींचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. ८,७५,९८,५१६/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.८६ % जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा सुधारीत देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.६४% जास्त दराचा आहे.

सदर कामाच्या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. च्या निधीतून कॉक्रीट रस्ता बनविण्यासाठीच्या निविदा मंजूर झालेल्या आहेत. मात्र सदरच्या प्रस्तावीत कॉक्रीट रस्त्याच्या कामापूर्वी त्याठिकाणी विषयांकीत जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. तसेच याकामासाठी यापूर्वी मुळनिविदेस एक वेळा मुदतवाढ देऊन पुरेशी स्पर्धा न झाल्यामुळे फेरनिविदा काढून फक्त एकच निविदा प्राप्त झालेली आहे. प्राप्त परिस्थितीचे अवलोकन तसेच कामाची निकड पाहता ठेकेदाराने दिलेले स्पष्टीकरण योग्य वाटत असल्याने ते मान्य करुन ठेकेदारास दराबाबतच्या वाटाघाटी करण्यात आलेली आहे. सदर वाटाघाटीअंती ठेकेदाराने अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दरात काम करण्यास सर्मथता दर्शवली आहे. निविदेची मुळ किंमत ७,४९,६०,१२४/- इतकी आहे व वाटाघाटीअंती १७.५० % जास्त दराने याप्रमाणे रु.८,८०,७८,१४६/- इतकी आहे. चालू दरसुची तसेच ठेकेदाराने जादा दराबाबत दिलेले स्पष्टीकरणाशी मुल्यांकीत केल्यास दर वाटाघाटीअंती ०.६४ % जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदर कामाकरीता “नविन जलवाहिनी टाकणे” या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. मा. विशेष महासभा दि.२०/०२/२०१८ ठराव क्र.६९ अन्वये सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर काम हे महानगरपालिकेच्या डी.पी.रोड वर होणार आहे.

**३) मिरारोड (पुर्व) एस.के.स्टोन सिग्नल ते शांती नगर सेक्टर-११ ऊंच जलकुंभापर्यंत मृदू पोलादी फिडरमेन जलवाहिनी टाकणे.**
**(अंदाजित रक्कम रु. १,८०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| **मे. विंध्या ट्रेडर्स** | **अंदाजपत्रक दरापेक्षा १७.१०% जास्त दराने**<br>**वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दरापेक्षा १७.००% जास्त दराने** |
| मे. देव इंजिनिअर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २०.००% जास्त दराने |

निविदा सुचना क्र.१०/०२ (२०१८-१९) दि.१९/०५/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेतील कामाकरीता दोन वेळा मुदतवाढ प्रसिध्दीअंती दि.०२/०७/२०१८ पर्यत एक निविदा मुदतीत प्राप्त झालेली होती. सदर निविदेस कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे फेर-निविदा सुचना क्र.१८/०६ (२०१८-१९) दि.०३/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निविदेस देखील कमी प्रतिसाद मिळालेला आहे.

त्या अनुषंगाने फेर-निविदा सुचना क्र.१९/०२ (२०१८-१९) दि.२४/०७/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेतील कामाकरीता प्रसिध्दीअंती दि.१३/०८/२०१८ पर्यत दोन निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या असुन वरीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत. सदर निविदेतील दर जास्त असल्याने महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या सन २०१८-१९ वर्षाच्या दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक तयार केले असता कामाची एकूण किंमत रु.१,९३,७८,२४४/- होत आहे. सदर किंमत निविदेतील अंदाजपत्रक रकमेपेक्षा ७.६६% जास्त होत आहे.

ठेकेदाराकडून जादाच्या दराबाबत प्राप्त स्पष्टीकरण पाहता उपरोक्त बाबी व्यतिरिक्त ठेकेदाराने निविदेमधील अंदाजपत्रकामध्ये काही बाबींचा अंतर्भाव नसला तरी निविदेतील अटी व शर्तीनुसार सदर बाबीं करणे आवश्यक

आहे. उदा. खोदाई पोटीचे स्वामित्वशुल्क , पाईपचा साठा करण्याच्या जागेचे भाडे, पाईपची वाहतुक, गुणवत्ता तपासणी शुल्क याबाबींचा अंदाजपत्रकामध्ये समावेश केल्यास अंदाजपत्रकाची किंमत रु. २,०९,९०,७१५/- इतकी येते म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.६१% जास्त दराची येते. म्हणजेच ठेकेदाराचा सुधारीत देकार मुल्यांकीत दरापेक्षा ०.३९ % जास्त दराचा आहे.

सदर कामासाठी यापूर्वी मुळनिविदेस दोन वेळा मुदतवाढ देऊन प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा काढून फेरनिविदेस दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त परिस्थितीचे अवलोकन तसेच कामाची निकड पाहता ठेकेदाराने दिलेले स्पष्टीकरण योग्य वाटत असल्याने ते मान्य करुन ठेकेदारास दराबाबतच्या वाटाघाटी करण्यात आलेली आहे. सदर वाटाघाटीअंती ठेकेदाराने अंदाजपत्रक दरापेक्षा १७.००% जास्त दरात काम करण्यास सर्मथता दर्शवली आहे. निविदेची मुळ किंमत १,८०,००,०००/- इतकी आहे व वाटाघाटीअंती १७.०० % जास्त दराने याप्रमाणे रु.२,१०,६०,०००/- इतकी आहे. चालू दरसुची तसेच ठेकेदाराने जादा दराबाबत दिलेले स्पष्टीकरणाशी मुल्यांकीत केल्यास दर वाटाघाटीअंती ०.३९% जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदर कामाकरीता "नविन जलवाहिनी टाकणे" या लेखाशिर्षाखाली तरतूद उपलब्ध आहे. मा. महासभा दि.२८/०३/२०१८ ठराव क्र.१०३ अन्वये सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर काम हे महानगरपालिकेच्या डी.पी.रोड वर होणार आहे.

उपरोक्त अ.क्र. १ ते ३ या कामाकरीता निविदाधारकाने सादर केलेले दरास मा. निविदा निवड समितीने शिफारस केलेली आहे. तसेच मा.आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व २ च्या कामांकरीता मे. देव इंजिनिअर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १७.५०% जास्त दर व अ.क्र. ३ च्या कामांकरीता मे. विंध्या ट्रेडर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा १७.००% जास्त दर प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२८, **निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)**

**मोहन म्हात्रे :-**

**उपरोक्त गोषवाऱ्यानुसार मे . हितेश इंन्टरप्रायजेस यांची रु . ५१,३०,९८४/- रक्कमेची निविदा मंजूर करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

